रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३५८
www.ramprahar.com

मंगळवार १५ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## पुढील वर्षाअखेरीस बुलेट ट्रेनची पहिली चाचणी



**नवी दिल्ली** : मुंबई-अहमदाबाददरम्यानच्या बुलेट ट्रेनची चाचणी २०२६च्या अखेरीस सुरत-बिलिमोरा सेक्शनवर होईल. बुलेट ट्रेन कॉरिडॉरवर वंदे भारत ट्रेन चालवली जाणार नाही, असे सरकारने म्हटले आहे. भारतातील पहिल्या बुलेट ट्रेनची चाचणी जपानमध्ये सुरू झाली आहे. ही चाचणी मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल कॉरिडॉरसाठी केली जात आहे. रेल्वे विभागाने सांगितले की, २०२६च्या सुरुवातीला जपान भारताला दोन शिंकान्सेन ट्रेन भेट देईल, ज्या भारतीय हवामान आणि भौगोलिक परिस्थितीनुसार चाचण्या घेतील. २०२९पर्यंत संपूर्ण कॉरिडॉरवर नियमित सेवा सुरू होण्याची शक्यता आहे. मुंबई-अहमदाबाददरम्यान दोन प्रकारच्या बुलेट ट्रेन धावतील. एक प्रीमियम सेवेची असेल. ती मुंबई आणि अहमदाबादमध्ये फक्त चार स्थानकांवर थांबेल, तर सामान्य बुलेट ट्रेन १२ स्थानकांवर थांबणार आहे.

### अंतरंग

पेणमध्ये गुरे चोरणारी टोळी पकडली/२

'केंद्राच्या योजनांची काटेकोर अंमलबजावणी करा'/५

राज्य कबड्डी स्पर्धेचा उद्यापासून पुण्यात थरार/८

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भाजपची तयारी

# मुख्यमंत्री करणार राज्याचा दौरा

### प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांआधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचा दौरा करतील. या दौऱ्यात निवडणुकांच्या तयारीसंदर्भात आढावा घेतला जाईल, अशी माहिती भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी (दि. १४) येथे दिली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला लागलेली गळती अद्याप थांबताना दिसत नाही. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तळकोकणातील अनेक पदाधिकारी, माजी नगरसेवक यांनी उद्धवसेनेला रामराम केला असून भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत 'कमळ' हाती घेतले. त्या वेळी ते बोलत होते.



प्रदेशाध्यक्ष चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र वेगाने पुढे जात आहे. कोकणातील स्थलांतरण रोखणे आवश्यक आहे. त्यासाठी रोजगार निर्मिती गरजेची आहे. अनेक प्रकल्प मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आकारले जात आहेत.

मुंबई येथील भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास पक्षाचे प्रदेश महासचिव आमदार विक्रांत पाटील, सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत आदी उपस्थित होते.

या वेळी मालवण नगरपालिका क्षेत्रातील 'उबाठा'चे माजी तालुकाध्यक्ष व माजी बांधकाम सभापती मंदार केणी, माजी बांधकाम सभापती व माजी नगरसेवक यतीन खोत, माजी आरोग्य सभापती व माजी नगरसेविका दर्शना कासवकर, शाखाप्रमुख भाई कासवकर, उपशहरप्रमुख नंदा सारंग, शाखाप्रमुख नितीन पवार, शाखाप्रमुख सई वाघ, युवासेनेचे उपशहरप्रमुख अमन घोडावले, शाखाप्रमुख संजय कासवकर, माजी नगरसेविका सेजल परब, अशोक कासवकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

## आदिवासी समाजाच्या वनसमस्या सोडवण्यासाठी आमदार महेश बालदी यांच्या पुढाकाराने बैठक

■ वनमंत्री गणेश नाईक यांचा मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघातील आदिवासी समाजाच्या वनविभागाशी संबंधित दीर्घकालीन समस्यांवर तोडगा काढण्यासाठी आमदार महेश बालदी यांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याशी सोमवारी (दि. १४) मुंबई येथे सविस्तर चर्चा केली. या बैठकीत मतदारसंघातील विविध गावांतील समस्या, मागण्या आणि प्रस्तावांचे तपशीलवार सादरीकरण करण्यात आले.

बैठकीत वनमंत्री गणेश नाईक यांनी या मागण्यांचा गांभीर्याने आढावा घेतला आणि संबंधित विभागांना योग्य त्या सूचना देऊन लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल, असा सकारात्मक प्रतिसाद दिला.



पनवेल तालुक्यातील आपटा येथील घेरावाडीला अभयारण्य अंतर्गत स्टेट बोर्ड ऑफ वाईल्ड लाईफची मान्यता मिळालेली आहे, मात्र प्रकल्पाची अंमलबजावणी पूर्ण करण्यासाठी नॅशनल बोर्ड ऑफ वाईल्ड लाईफची मान्यता आवश्यक आहे. ती तत्काळ मिळावी अशी मागणी या बैठकीत करण्यात आली. गुळसुंदे गावातील डोंगरीचीवाडी ही दरडग्रस्त क्षेत्रात येते. येथील नागरिकांचे प्राण आणि मालमत्ता धोक्यात आहेत. त्यामुळे या वाडीचे सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करण्यासाठी तत्काळ प्रस्ताव तयार करून संबंधित विभागाकडे पाठवण्याची मागणी झाली. चिंचवण लेंडेवाडी येथील ३/२ प्रस्तावाला मान्यता मिळावी. साई येथील आश्रमशाळेसाठी आवश्यक असलेल्या जागेच्या शहानिशेची प्रक्रिया रखडली आहे, विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून ती प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी आणि योग्य निर्णय घ्यावा. कर्नाळा हद्दीतील सर्व्हे क्र.९/२ अ या सातबाऱ्यावरील इतर हक्क महाराष्ट्र खाजगी वने अधिनियम ६३१ नोंद रद्द करण्यासंदर्भात शाहनिशा करून योग्य तो निर्णय मिळावा. मोदी माळ (सवणे) येथील वाडीला रस्ते, पाणी, वीज अशा मूलभूत सुविधा मिळण्यासाठी ३/२ प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे त्याला मान्यता देऊन काम सुरू करावे. कर्नाळा घेरावाडी येथील महिलांच्या बचत गटाला स्वावलंबनासाठी खादी ग्रामोद्योग स्टॉल उपलब्ध करून द्यावेत तसेच खालापूर तालुक्यातील हाशाचीपट्टी वाडीतील आदिवासी समाजाला पायाभूत सुविधा मिळण्यासाठी फॉरेस्ट कॉन्सर्व्हेशन ॲक्ट अंतर्गत तत्काळ प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी पाठवावा, अशा मागण्या, प्रलंबित प्रस्ताव, स्थानिक समस्यांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

आदिवासी समाजाचा हक्क, वन हक्क कायदा तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे झालेली स्थलांतराची गरज, वनविभागाची नियमावली या सर्व बाबी लक्षात घेऊन योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले.

या बैठकीबाबत आमदार महेश बालदी म्हणाले, उरण विधानसभा मतदारसंघातील आदिवासी समाजाचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच त्यांच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. शासनाची योजना, वनहक्क कायदा, पुनर्वसन धोरण या सगळ्यांशी समन्वय साधून त्यांची अंमलबजावणी करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. या बैठकीत वनमंत्री गणेश नाईक यांनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद निश्चितच समाधानकारक असून लवकरच या सर्व मागण्यांवर ठोस निर्णय अपेक्षित आहे.

## रायगड जि.प. आणि पं.स. सार्वत्रिक निवडणुकीसंदर्भात प्रारूप प्रभाग रचना जाहीर

■ २१ जुलैपर्यंत हरकती सादर करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२चा अधिनियम क्र. ५) अंतर्गत रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक विभाग व प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडून सादर करण्यात आलेल्या आदेशाच्या आधारे राज्य शासनाच्या राजपत्रात ही रचना सोमवारी (दि. १४) प्रसिद्ध झाली आहे.

या प्रारूप आदेशाच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद कार्यालयातील फलकावर तसेच जिल्ह्यातील सर्व तहसीलदार व पंचायत समिती कार्यालयांच्या सूचना फलकांवर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. राज्य शासन अथवा प्राधिकृत अधिकारी (जिल्हाधिकारी रायगड) यांच्याकडून या प्रारूप रचनेवर १४ जुलैनंतर विचार करण्यात येणार आहे.

या संदर्भात कोणालाही हरकत अथवा सूचना असल्यास ती लेखी स्वरूपात कारणांसह संबंधित तहसीलदारांकडे २१ जुलैपर्यंत सादर करावी. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या हरकती किंवा सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळविले आहे.

## पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे आंदोलन आश्वासनानंतर स्थगित

**पुणे : प्रतिनिधी**

'कॅरी ऑन' परीक्षासंदर्भात सातत्याने पाठपुरावा करूनही पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाने कोणतीही दखल न घेतल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी सोमवारी (दि. १४) विद्यापीठात आंदोलन पुकारले होते. यावर दोन दिवसांत निर्णय घेऊ, असे विद्यापीठाने सांगितल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

पुणे विद्यापीठाचे प्रभारी आंदोलन स्थळी भेटण्यासाठी दाखल झाले. कुलगुरू दिल्लीमध्ये असून युसीजीकडे विद्यापीठाचे शिष्टमंडळ गेलेले आहे. येत्या दोन दिवसांमध्ये आम्ही निर्णय घेऊ, असे आश्वासन विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना देण्यात आले आहे.

### निवडक

#### शिवसेना पक्ष, चिन्ह प्रकरणावर आता २० ऑगस्टला सुनावणी

**नवी दिल्ली** : शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणाची सुनावणी पुढील महिन्यापर्यंत लांबणीवर गेली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला निवडणूक आयोगाने दिलेले पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह गोठवण्यात यावे, अशी मागणी करणारी याचिका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने सर्वोच्च न्यायालयात केली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता २० ऑगस्टला होणार आहे.

#### हरियाणा, गोवा, लडाखसाठी नव्या राज्यपालांची नियुक्ती

**नवी दिल्ली** : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी हरियाणा, गोवा आणि लडाख या केंद्रशासित प्रदेशात नवीन राज्यापालांची नियुक्ती केली आहे. अनुक्रमे प्रा. अशीम कुमार घोष, पुसपती अशोक गजपती राजू आणि कविंदर गुप्ता तेथे काम पाहतील. लडाखचे नायब ब्रिगेडियर (सेवानिवृत्त) बी.डी. मिश्रा यांनी पदाचा राजीनामा दिल्याने गुप्ता यांची नियुक्ती नायब राज्यपाल म्हणून करण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांनो, सर्जनशीलता विकसित करा -शिक्षण उपसंचालक कंकाळ

### सीकेटी विद्यालयात गुणगौरव सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षणामुळे खूप काही शक्य होते. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना आपली गुणवत्ता टिकवून ठेवावी व सर्जनशीलता विकसित करावी, असे मार्गदर्शन मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक आर.आर. कंकाळ यांनी केले. ते नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयात आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात बोलत होते.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात रविवारी (दि. १३) संस्थेचे श्रद्धास्थान स्व. चांगू काना ठाकूर यांच्या २३व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत विशेष प्राविण्य संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. हा सोहळा संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थिती झाला.



या वेळी प्रमुख पाहुणे शिक्षण उपसंचालक आर.आर. कंकाळ यांनी मनोगतात, परिवर्तन घडवायचे असेल तर शिक्षण हे महत्त्वाचे साधन नाही. आज मी शिक्षण उपसंचालक म्हणून जे पद भूषवित आहेत ते केवळ शिक्षणामुळेच शक्य झाले आहे, असे नमूद केले. जेबीएसपी संस्थेची धुरा यशस्वीपणे सांभाळणारे रोलमॉडेल लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याविषयी त्यांनी या वेळी गौरवोद्गार काढले. रयत शिक्षण संस्थेला १०० कोटी रुपयांची देणगी देणारे दानशूर व्यक्तिमत्व अशा शब्दांत त्यांचे कौतुक केले.

समारंभाचे अध्यक्ष, संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलेल्या विकासामुळे भारताला आज जगात चौथ्या क्रमांकाचे स्थान आहे. आपला देश विविध क्षेत्रांमध्ये प्रगती करतोय. अशा वेळी आपल्या शाळेला ३१ वर्षे झाली आहेत. शाळा पिढ्यान्‌पिढ्या शिक्षण देते.

#### चांगले शिक्षण घेऊन नावलौकिक मिळवा -लोकनेते रामशेठ ठाकूर

*संस्थेचे चेअरमन, लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, शाळा ही आयुष्य घडविण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे केंद्र असते. विद्यार्थ्यांना घडवून भावी सुजाण नागरिक बनविण्याच्या दृष्टीने शाळेची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण आहे. तुम्हा सर्वांना मोलाचे आयुष्य मिळाले आहे. चांगले शिक्षण घेऊन नावलौकिक मिळवा.*

विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन मोठे व्हावे.

संस्थेचे कार्यकारिणी सदस्य आमदार प्रशांत ठाकूर यांनी विचार व्यक्त करताना म्हटले की, आज पनवेल परिसरात रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण झाल्या आहेत. अनेक प्रकल्प येत आहेत. विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन आपले करिअर घडविणे गरजेचे आहे. सीकेटी शाळेत दर्जेदार शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांसाठी ही शाळा नेहमी पाठीशी उभी असणार आहे.

व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख यांनी सांगितले की, जेबीएसपी ही संस्था गेली ३१ वर्ष असे सोहळे साजरे करत आहे. आज संस्थेत केजीपासून पीएचडीपर्यंत शिक्षण दिले जात आहे. नव्या पिढीला सर्व शैक्षणिक सुविधा पुरविण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर अहोरात्र मेहनत घेत आहेत. त्यामुळेच संस्थेचा आलेख सतत उंचावत आहे.

उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे यांनी प्रास्ताविकात संस्थेने गेल्या ३१ वर्षात केलेला प्रगतीचा आलेख सादर केला. सातत्याने प्रगतीपूर्ण यशस्वी वाटचाल करून आज संस्थेचे नाव साता समुद्रापलीकडे गेले आहे, असे ते म्हणाले. **(पान २ वर..)**



## संकष्ट चतुर्थीनिमित्त गणपती मंदिरे फुलली

### जोरदार पावसातही भाविकांनी घेतले बाप्पाचे दर्शन

**खोपोली, पाली, उरण : प्रतिनिधी**

सततचा पाऊस असूनही सोमवारी (दि. १४) संकष्ट चतुर्थीच्या निमित्ताने मोठ्या संख्येने गणेशभक्तांनी ठिकठिकाणच्या मंदिरात जाऊन गणरायाचे दर्शन घेतले. त्यामुळे विविध मंदिरे भाविकांनी फुलल्याचे दिसून आले.

अष्टविनायकांपैकी वरदविनायकाचे क्षेत्र महड, बल्लाळेश्वर पाली तसेच महागणपती चिरनेर (उरण) व अन्य ठिकाणच्या गणेश मंदिरात भाविक दर्शनासाठी आले होते. आलेल्या भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून श्री क्षेत्र महड देवस्थान कमिटी व स्थानिक नागरिकांनी आपापल्या स्तरावर सोयी सुविधा उपलब्ध केल्या होत्या. मंदिर व्यवस्थापक राजेंद्र बडगुजर यांनी दिलेल्या माहितीनुसार पाऊस असूनही पहाटेपासून दर्शनासाठी भाविकांची रांग लागली होती.

पाली येथे मंदिराला विद्युत रोषणाई व आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. मंदिरात व मंदिराबाहेर सुबक रांगोळ्यादेखील काढल्या होत्या. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल्स ग्राहकांनी गजबजल्याचे या वेळी पहावयास मिळाले.

## आदई येथील डोंगरावरून पडून एकाचा मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या आदई धबधब्याजवळील डोंगरावरून पडून एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. १३) दुपारी ३च्या सुमारास घडली. रवी गाडेकर (वय २४) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मुंबईतील चेंबूर येथून पाच जण आदई धबधब्याजवळील डोंगरावर रविवारी गेले होते. या वेळी रवी गाडेकर याचा पाय घसरला आणि तो खाली पडला. त्यातच त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती खांदेश्वर पोलिसांना दिल्यानंतर पोलीस आणि अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. या घटनेची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## मुरुडमध्ये कारच्या धडकेत दुचाकीवरील दोन जण ठार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील बारशीव गावाजवळ एका कारने रस्त्याच्या विरुद्ध दिशेला जाऊन दुचाकीला उडविले. यामध्ये दुचाकी चालवणारा व पाठीमागे बसलेला एक जण असे दोन जण जागीच ठार झाले. अपघातानंतर कारचालकाने घटनास्थळावरून पळ काढला होता. त्याला रेवदंडा पोलिसांनी तातडीने पावले उचलत रोहा चेकपोस्ट येथे ताब्यात घेतले.

### पळालेल्या चालकाला पोलिसांनी घेतले ताब्यात

मुरूड येथील अक्षय किसनलाल जयस्वाल (वय २७) हा त्याचा मित्र लालचंद्र रामप्रसाद गौड (वय ३५) याला सोबत घेऊन मोटरसायकलने (एमएच ०६-बीके ८०३१) रविवारी (दि. १३) सायंकाळी रेवदंडा बाजूकडून मुरूडकडे प्रवास करीत होता. हे दोघे ६.४०च्या सुमारास बारशीवनजीक आले असता समोरून आलेल्या मारुती एसक्रॉस कारने (एमएच ०६-बीयु २७४४) दुचाकीला धडक दिली. या अपघातात अक्षय आणि लालचंद्र यांना गंभीर स्वरूपाची दुखापत होऊन दोघांचाही मृत्यू झाला. अपघातानंतर कारचालक संदीप प्रभाकर म्हात्रे (रा. अलिबाग) पळून गेला होता. रेवदंडा पोलिसांनी त्याला शिताफीने रोहा चेकपोस्ट येथे ताब्यात घेतले. त्याच्या विरोधात रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## किल्ले रायगड परिसरात बिबट्याचा बकऱ्यांवर हल्ला

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगड परिसरात गेल्या दोन दिवसांपासून बिबट्याचा संचार वाढल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले आहे. हा बिबट्या मानवी वस्तीमध्ये फिरत असून रविवारी रात्री त्याने नांदगाव बुद्रुक गावात तीन बकऱ्यांचा फडशा पाडला.

किल्ले रायगड परिसरात शनिवारी एका शेतकऱ्याला बिबट्याचे दर्शन झाले होते. त्यानंतर रविवारी रात्री नांदगाव बुद्रुक गावात बिबट्याने विजय चिंतामण जाधव या शेतकऱ्याच्या तीन बकऱ्या मारून टाकल्या. बकऱ्यांच्या आवाजाने ग्रामस्थ जागे झाले आणि हा बिबट्या पळून गेला. या घटनेमुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले असून याबाबत महाड वनविभागाला कळविण्यात आले आहे.

महाड वनविभागाच्या रायगड विभागीय कार्यालयाकडून पंचनामा करण्यात आला असून विजय जाधव या गरीब शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

# पेणमध्ये गुरे चोरणारी टोळी पकडली

## तीन लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

**पेण : प्रतिनिधी**

पेण वरवणे विभागातून गुरे पळवणाऱ्या टेम्पोला पेण व खोपोली येथील गोरक्षकांनी सापळा रचून वाक्रुळ स्मशानभूमी येथे पकडले आहे. या बंद टेम्पोमध्ये एकूण सात गुरे सापडली आहेत. यातील दोन आरोपींना पकडण्यात गोरक्षकांना यश आले असून मुख्य आरोपीने पळ काढला आहे. या वेळी एकूण जवळपास तीन लाख ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करून यातील चार आरोपींवर पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की फिर्यादी गोपालन संस्थेचे अध्यक्ष मंगल पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी



कत्तलीसाठी गुरे चोरून नेणाऱ्या टोळीला वापरून वाक्रुळ गावाच्या हद्दीतील स्मशानभूमीजवळ पिकअप टेम्पो मध्ये लहान गावठी जातीचे चार वासरू आणि तीन मोठ्या जातीच्या गाई अशा साठ हजारांची गुरे आणि तीन लाखाचा टाटा कंपनीचा इंट्रा व्ही टेम्पो मिळून एकूण ३ लाख ६० हजारांचा दस्तऐवज जप्त करण्यात आला आहे.

यातील आरोपी शोयब अजीजजुल रहेमान सय्यद (वय ४०) व मुनाफ मुनीर शेख (वय ३२, रा.गोवंडी मुंबई) तसेच लक्षण मरगळा पत्ता माहीत नाही आणि संतोष विठ्ठल येरणकर (रा. मांगरुळ पेण) या चार आरोपींवर पेण पोलिस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक एन.ए.रसाळ करत आहेत.

# रुग्णवाहिकेमध्येच महिलेची प्रसूती; अर्भकाचा दुर्दैवी मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

ओंबळी धनगरवाडीतील महिलेला १०८ ऐवजी १०२ रूग्णवाहिकेतून पोलादपूर ग्रामीण रूग्णालयात आणताना रूग्णवाहिकेमध्येच महिलेची प्रसुती होऊन तिच्या नवजात अर्भकाचा मृत्यू झाल्याच्या घटनेमुळे पोलादपूर तालुक्यातील आरोग्यव्यवस्थेची रूग्णांप्रती पुन्हा एकदा अनास्था उघडकीस आली आहे.

पोलादपूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र पळचिल अंतर्गत ओंबळी धनगरवाडी गौळवाडीतील महिला चंद्रा महादेव बर्गे या महिलेला सोमवारी सकाळी प्रसवपिडा सुरू झाल्याने तिला पोलादपूर ग्रामीण रूग्णालयात आणण्यासाठी १०८ रूग्णवाहिकेचे बुकींग करण्यात आले, मात्र पुणे येथून या गाडीचे बुकींग होईपर्यंत अर्ध्या तासाहून अधिककाळ जाण्याची शक्यता लक्षात घेत ग्रामीण रूग्णालयात उपलब्ध १०२ रूग्णवाहिका पाठविण्यात आली.

या वेळी आशासेविका व सहायक यांनी या महिलेला ओंबळी धनगरवाडीतील घरातून रूग्णवाहिकेने ग्रामीण रूग्णालयाकडे नेले जात असताना पैठण गावाजवळ या महिलेची प्रकृती अस्वस्थ झाल्याने आशासेविकेने परिचारिका महिलेला रूग्णवाहिकेसोबत राहण्यास सांगितले. मात्र, परिचारिकेने कोतवाल खुर्द येथे पल्सपोलिओ देण्यासाठी जाण्याचे कारण पुढे करीत प्रसवपिडा होणाऱ्या महिलेकडे दूर्लक्ष केले आणि ती कोतवाल खुर्दला निघून गेली. यानंतर काही वेळाने चंद्रा बर्गे या महिलेची १०२ रूग्णवाहिकेतच प्रसुती होऊन काही कालावधीतच नवजात अर्भकाचा मृत्यू झाला.

# माथेरान 'हौस'फुल्ल; पर्यटकांना मनस्ताप

## साडेतीन किलोमीटरची करावी लागली पायपीट

**नेरळ : प्रतिनिधी**

शनिवार, रविवार सुट्ट्यांचा निमित्याने माथेरानमध्ये पर्यटकांची तुफान गर्दी दिसून येत असून 'हौस'फुल्ल गर्दी पहायला मिळत आहे, मात्र माथेरान फिरण्यासाठी देशातून पुणे, ठाणे, मुंबई या परिसरातून सर्वाधिक पर्यटक एका दिवसाचा आनंद घेण्यासाठी माथेरान येथे येत असताना या पर्यटकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. रविवार माथेरान येथे प्रथमच २५ हजाराहून अधिक पर्यटकांनी हजेरी लावली, मात्र पर्यटकांच्या परतीच्या प्रवासात वाहतूक कोंडीत अडकल्याने पर्यटकांना माथेरान दस्तुरी नाका ते वॉटर पाईप या साडेतीन किलोमीटरची पायपीट करावी लागली.

रविवार वीकेंडला सर्वाधिक पर्यटकांची गर्दी माथेरान येथे पहायला मिळाली, दरम्यान या पर्यटकांचे



परतीच्या प्रवासावेळी चांगलेच हाल झाले. घाटात वाहतूक कोंडी झाल्याने नेरळ येथून माथेरान जाणारे वाहन वॉटर पाईप याठिकाणी थांबत असल्याने दस्तुरी वरून येणाऱ्या पर्यटकाना तीन किलोमीटर पायी पायपीट करून नंतर मिळेल त्या वाहनाने नेरळ गाठावे लागले. स्थानिक वाहन चालकांनी पर्यटकाना मदत केली, परंतू यामध्ये पर्यटकांचे हाल झाले. काही पर्यटक रिक्षात तर काही टेम्पोत उभे राहून प्रवास करीत होते. काहींनी तर थेट माथेरान ते नेरळ पायी वारीचं काढली.

नेरळ रेल्वे स्थानकातील ट्रेन पकडण्याची प्रचंड गर्दी झाली होती. दरम्यान ही वाहतूक कोंडी दर शनिवार रविवार होत असल्याने यावर कायम स्वरुपी तोड्गा काढावा म्हणून मागणी पुढे येत आहे.

# चौक येथे मॉकड्रिल; आपत्कालीन परिस्थितीत मार्गदर्शन

**चौक : प्रतिनिधी**

चौक येथील हॉटेल स्वराज येथे खालापूर पोलिसांच्या वतीने मॉक ड्रिल करण्यात आले.आपत्कालीन परिस्थितीत हल्ला, आग, भूकंप या परिस्थितीत काय करावे याचा सराव करण्यात आला.लोकांना या परिस्थितीत काय करायचे, कसे वागायचे याचे प्रशिक्षण मॉक ड्रिल माध्यमातून मिळते.

आगामी सण, उत्सव अनुषंगाने मॉकड्रील व घेण्यात आला. पोलीस निरीक्षक सचिन पवार, राखीव पोलिस निरीक्षक बाविस्कर, पोलीस उप निरीक्षक शिवाजी जुंदरे, चौक दूर क्षेत्र प्रभारी विशाल पवार,अलिबाग रायगड,राईट कंट्रोल फोर्स प्रशिक्षक ०३, मुख्यालय कडील अंमलदार ७२, ठउझ वडखळ ३५ जवान व खालापूर पोलिस ठाणे कडील ३ अधिकारी व



१४ अंमलदार हजर होते.मॉक ड्रिल म्हणजे आपत्कालीन परिस्थितीचा म्हणजे आग, भूकंप, हल्ला यांचा सामना करण्यासाठी एक सराव किंवा रंगीत तालीम करणे.लोकांना या परिस्थितीत काय करायचे आहे, याची माहिती देण्यासाठी आणि तयारी करण्यासाठी मॉक ड्रिल आयोजित केले जाते. मॉक ड्रिल म्हणजे प्रत्यक्ष घटनेची भीती न ठेवता,सुरक्षित वातावरणात आपत्कालीन परिस्थितीचा सराव करणे.लोकांना जलद आणि प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी तयार करणे.लोकांना सुरक्षित ठेवण्यासाठी आणि जीवितहानी टाळण्यासाठी मॉक ड्रिल उपयुक्त आहे.

विविध आपत्कालीन सेवा देणारे अग्निशमन दल, पोलीस, वैद्यकीय सेवा यांच्यात समन्वय साधणे.लोकांना आपत्कालीन परिस्थितीत काय करावे, याबद्दल जागरूक निर्माण करणे.मॉक ड्रिलमुळे लोकांना आपत्कालीन परिस्थितीत शांत राहून योग्य निर्णय घेण्यास मदत होते.

# खासगी बसने प्रवास करणाऱ्या शिक्षिकेच्या दागिन्यांची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

छत्रपती संभाजी नगर येथून खासगी ट्रॅव्हल्समधून बास करणाऱ्या एका शिक्षिकेचे डीच लाख रुपये किमतीचे दागिने अज्ञात चोरट्याने प्रवासादरम्यान चोरल्याची घटना उघडकीस आली आहे. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे

मीना हानवते (वय ४६) असे या शिक्षिकेचे नाव असून त्या छत्रपती संभाजी नगर येथे राहतात. जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत

## कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

असलेल्या मौना यांची विवाहित मुलगी कळंबोलीत राहते. त्या पतीसह श्रेयस ट्रॅव्हल्स या खाजगी बसने कळंबली येथे येत होत्या. दरम्यान, त्यांनी त्यांच्यासोबत २ लाख ५६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने घेतले होते. दागिने असलेला बॉक्स त्यांनी बॅगेमध्ये ठेवून ही बॅग सीटच्या वरच्या भागात ठेवली होती. पहाटे सव्वा दोनच्या सुमारास त्यांची बस जेवणासाठी सुपे येथील हॉटेल निसर्ग येथे थांबली होती. त्यावेळी हानवते दाम्पत्य बसमधून खाली उतरले होते. त्यानंतर त्यांची बस सकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास कळंबोली येथे पोहचल्यानंतर हानवते दाम्पत्य रिक्षाने आपल्या मुलीच्या घरी गेले. तेथे पोहचल्यानंतर त्यांनी आपली बॅग तपासली असता, त्यातील बॉक्समधील दागिने गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

बसमधून प्रवास करताना चोरट्याने त्यांचे दागिने चोरल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# वाईन शॉपमधून साडेसतरा लाखांच्या मद्याची चोरी

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर ३१ ए मधील व्ही फाय लिविंग लिक्विड या मध्याच्या दुकानातून, अज्ञात इसमाने साडे १७ लाखांच्या मध्याची चोरी केल्याची घटना घडली आहे.




वाशी, सेक्टर ३१ ए, मधील वाशी गावात व्ही फाय लिविंग लिक्विड नावाचे एक वाईन शॉप आहे. रात्री वाईन शॉप बंद करून मालक व कामगार घरी गेल्यावर, अज्ञात इसमाने वाईन शॉप चे शटर उचकटून आत मध्ये प्रवेश केला व दुकानातून १७ लाख ३८ हजार ८८८ रुपयांची विविध कंपन्यांच्या मध्याच्या बॉटल्स व २० हजार रुपयांची रोख रक्कम, असा एकूण १७ लाख ५८ हजार ८८८ रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली.

सकाळी दुकान उघडताना शटर विचित्र अवस्थेत आढळून आल्याने, आत मध्ये पाहणी केली असता चोरी झाल्याचे लक्षात येताच, वाशी पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

# मोरबे धरणग्रस्तांच्या प्रश्नांबाबत देवराज देशमुख यांचा पुढाकार



**चौक : प्रतिनिधी**

गेली ३४ वर्ष न्याय मागणीसाठी लढणाऱ्या प्रकल्पग्रस्त यांनी जनजागरण प्रतिष्ठान चे प्रमुख, भारतीय जनता पक्षाचे नेते आणि प्राधिकरण उपाध्यक्ष, पुनर्वसन कायदा माहिती असलेले माधव भंडारी यांना हकीगत सांगितली. राज्य समन्वयक देवराज देशमुख यांना त्यांनी मोरबे धरणावर पाठवले आणि व्यथा जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, मोरबे धरणावर तीन दिवस उपोषण सुरू होते, आमरण उपोषण म्हणजे पर्याय नाही, त्यामुळे आपण वेगळ्या पद्धतीने आंदोलन करू असा विश्वास राज्य समन्वयक देवराज देशमुख यांनी मोरबे धरणग्रस्त यांना दिला. मोर्बे प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन कायद्या प्रमाणे ज्येष्ठ नेते माधव भांडारी यांच्या नेतृत्वाखाली न्याय मिळणार याची खात्री प्रकल्पग्रस्त यांना पटली. त्यामुळे देवराज देशमुख यांनी प्रथम गाव निहाय संकलन यादी तयार केल्यावर त्याचे फायदे सांगितले.

पुनर्वसन मंत्री, पुनर्वसन सचिव यांच्या समवेत बैठक आयोजित करून न्याय मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल असे राज्य समन्वयक देवराज देशमुख प्रस्तुत प्रतिनिधी यांच्याशी बोलताना सांगण्यात आले.

# विसापूर किल्ल्यावर वाट चुकलेल्या पर्यटकांची अखेर सुखरूप सुटका

**खालापूर : प्रतिनिधी**

पुणे येथील १४ युवा पर्यटक मावळातील विसापूर किल्ला येथे पर्यटनासाठी गेले असता. रात्रीच्या अंधारात वाट चुकले. त्यांची शिवदुर्ग मित्र मंडळाच्या सदस्यांनी सुखरुप सुटका केली

ओंकार आप्पासाहेब शिंदे, पार्थ नरेश मगर, क्षितिजा अतुल जैन, सुप्रिया विठ्ठल शिंदे, धनश्री जगन्नाथ शिंदे, स्नेहा सिताराम भिंगारे यांच्यासह डि वाय पाटील महाविद्यालय पुणे येथील १४ युवा पर्यटक



मावळातील विसापूर किल्ला येथे पर्यटनासाठी गेले होते. उर्वरित ग्रुप पाटण गावातून मळवली रेल्वे स्टेशन येथे चालत गेला होते, मात्र ६ तरुण तरुणी मागे राहिल्याने रात्रीच्या अंधारात खाली उतरणारी वाट चुकले आणि तरुण तरुणींमध्ये घबराट निर्माण झाली.

याची माहिती शिवदुर्ग मित्र मंडळांचे सुनील गायकवाड यांना मिळाल्याने त्यांनी आपल्या सवंगड्यांसह घटनास्थळी दाखल झाले. शिवदुर्ग मित्र मंडळ लोणावळा यांच्या साडेतीन तासाच्या अथक प्रयत्नाने सर्वांना सुखरुप खाली आणले व त्यांच्या सहकाऱ्यांच्या ताब्यात दिले. अत्यंत नियोजनबद्धरितीने हे ऑपरेशन पूर्ण करण्यात आले.

# इंदापूरमध्ये 'उबाठा'ला धक्का; कार्यकर्ते शिवसेनेत

**माणगाव : बातमीदार**

श्रीवर्धन मतदार संघातील रुद्रवली आदिवासी वाडी नंबर दोन या वाडीतील तरुणांनी मंत्री भरत गोगावले यांच्या ढालकाटी येथील निवासस्थानी येत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

उबाठामध्ये राहून कोणतीही कामे होत नाहीत. त्यामुळे आमची वाडी विकासापासून वंचित राहत आहे शिवसेना पक्षात भरतशेठ गोगावले विकासाचा धडाका पाहून शिवसेना पक्षात प्रवेश करत आहोत असे त्यांनी सांगितले. यामध्ये रुद्रवली आदिवासी वाडी नंबर दोन मधील देविदास जाधव, शकुन जाधव, भाग्या वाघमारे, अंकुश दिलमा, दत्ताराम वाघमारे, योगेश वाघमारे, रोहिदास पवार, परशुराम वाघमारे, मारुती वाघमारे, राजा दिलमा, रोहिदास मोरे, समीर मोरे यांच्यासह जवळपास २० ते २५ आदिवासी



बांधवांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

या पक्षप्रवेश समारंभावेळी ढालकाटी येथे माणगाव तालुक्यातील शिवसेना युवा सेनेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

पान १ वरुन

## विद्यार्थ्यांनो, सर्जनशीलता विकसित करा –शिक्षण उपसंचालक कंकाळ

या कार्यक्रमास संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेवक समीर ठाकूर, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, सुशीला घरत, ॲड. वृषाली वाघमारे, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य राहुल घरत व स्वप्नील ठाकूर, रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेज खारघरच्या प्राचार्य निशा नायर, सीकेटी विद्यालय माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग मुख्याध्यापक कैलास सत्रे, माध्यमिक विभाग इंग्रजी माध्यम मुख्याध्यापक संतोष चव्हाण, उच्च माध्यमिक विभाग प्राचार्य प्रशांत मोरे, प्राथमिक विभाग मराठी माध्यम मुख्याध्यापक सुभाष मानकर, प्राथमिक विभाग इंग्रजी माध्यम मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, अजित सोनवणे, स्वाती पाटील, नीरजा अधुरी, वैशाली पारधी यांच्यासह पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक चव्हाण यांच्या आभार प्रदर्शनानंतर संगीत शिक्षक रूपेश मढवी यांनी सादर केलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पनवेलमध्ये १०५ जणांचे शिबिरात रक्तदान

**पनवेल : वार्ताहर**

श्री प्रल्हादराव झुलेलाल ट्रस्ट, आम्ही रक्तदाते पनवेलचे ,पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट, विद्यार्थी वाहक संस्था पनवेल, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउन ,पनवेल नवी मुंबई प्रिंट डिजिटल पत्रकार संघटना व पनवेल तालुका पत्रकार विकास मंच यांच्या वतीने झुलेलाल मंदिर येथे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये एकूण १०५



रक्तदात्यांनी सहभाग घेतला

यावेळी आरोग्य तपासणी शिबिर व अवयव दान विषयीच्या मार्गदर्शन शिबिरास पनवेलकरांनी भरघोस पाठिंबा दिला. सदर शिबिर यशस्वी करण्याकरिता ॲडव्होकेट मनोहर सचदेव, अमोल साखरे, मुरलीधर ढाके, भूषण चोणकर, किसन रौंदळ, पांडुरंग हुंमणे ,निलेश पोटे, इंदुमती ठक्कर, सचिन भिसे, संगीता साखरे यांनी विशेष मेहनत घेतली.

रक्तदान शिबिराला पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी सदिच्छा भेट दिली व रक्तदात्यांचे मनोधैर्य वाढवले. या रक्तदान शिबिरात ५८ वर्षाच्या मालोतकर यांनी पहिल्यांदा रक्तदान केले. ॲड्.सचदेव यांनी सर्व रक्तदात्यांचे व शिबिरामध्ये सहभागी सर्व संस्थांचे आभार मानले

# भाजप विद्यार्थ्यांसोबत कायम

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन ▌ खांदा कॉलनीमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसराचे चित्र हे विमानतळ सुरू झाल्यानंतर संपुर्ण बदलणार आहे. शिक्षणासोबत विकासाच्या, रोजगाराच्या तसेच स्वयंरोगाराच्या अनेक संधी निर्माण होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील काळात शिक्षणाच्या आणि रोजगाराच्या बाबतीत कोणतीही समस्या जाणवली तर ती समस्या सोडवण्यासाठी भाजप तुमच्या सोबत आहे, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभावेळी दिली तसेच विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



खांदा कॉलनी भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून आणि माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ रविवारी (दि.१३) आयोजीत करण्यात आला होता. हा सोहळा खांदा कॉलनीमधील श्री कृपा हॉलमध्ये झाला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, भाजप नेते भिमराव पोवार, मोतीलाल कोळी, रामनाथ पाटील, गोपीनाथ मुंडे, शांताराम महाडीक, अरविंद्र जाधव, सचिन गायकवाड, अविनाश गायकवाड, दिपक जांभळे, विजयकुमार पाटील, जितेंद्र माने, दत्तात्रय खंडागळे, भोसले मॅडम, स्वारी नांगरे, युवराज बेडसे, डॉ. आषा मुंडे, विद्या जाधव, स्नहेल सपकाळ, सुनिता मोरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत बाजी

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी विद्यालयाची परंपरा राखत पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत चांगलीच बाजी मारली आहे.

या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. सीकेटी विद्यालयाच्या पूर्व उच्च प्राथमिक विभागातील पाचवी मधील वेद मिलिंद, राजे साईप्रसाद केदार, समांता अंकुश अविजित, नायक प्रणय हरिश, अभिराज घाडिगावकर, स्वरांश वांधेकर, ओम देवळे, अदिती केणी, तनिषा देवाडकर या नऊ विद्यार्थ्यींना शिष्यवृत्ती मिळाली आहे. तर पूर्व माध्यमिक म्हणेजच आठवीच्या धवल पाटील, ज्ञानदा सुर्वे, अर्थव पाटील या तीन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे. विद्यार्थ्यांच्या सत्कारावेळी भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, मुख्याध्योक संतोष चव्हाण, विद्यार्थी उपस्थित होते.



# आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा : कळंबोली येथे वर्ग अंतर्गत फेरी उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, बोलण्याचे कौशल्य विकसित करणे आणि नव्या पिढीला नेतृत्वक्षम बनवणे, या उद्देशाने माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व' स्पर्धेची वर्ग अंतर्गत फेरी कळंबोली येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मोठ्या उत्साहात झाली.



या स्पर्धेत इयत्ता आठवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी माझं कुटुंब, माझं स्वप्न, शिक्षणाचं महत्त्व, प्लास्टिक मुक्त भारत, इंटरनेट वरदान की शाप असे विचारांना चालना देणारे विषय निवडून प्रभावी भाषणं सादर केली. प्रत्येक विद्यार्थ्याने आपले विचार स्पष्ट, आत्मविश्वासपूर्वक आणि रसाळ शैलीत मांडले.

या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे कळंबोली मंडल अध्यक्ष व स्थायी समिती सभापती अमर पाटील, माजी अध्यक्ष रवींद्र पाटील, माजी नगरसेवक रवींद्र भगत, राजू शर्मा, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर, रामा महानवर, संदीप म्हात्रे, सुनील ढेंम्बरे, प्रकाश शेलार, संदीप भगत, सीत्तु शर्मा, अमर ठाकूर, जमीर शेख, ज्ञानेश्वर चौधरी, द्यानश्याम शर्मा, आभा गुरकुडे, केशव यादव, देविदास खेडेकर, दीपक दुधवडे, कळंबोली युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, निशान गिल, दिलीप बिष्ट यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

शाळेचे मुख्याध्यापकांनी सांगितले की, या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना स्वतःला व्यक्त करण्याची संधी मिळते. हीच पिढी उद्या समाजाचे नेतृत्व करणार आहे.विद्यार्थ्यांनी आपले विचार मोकळेपणाने मांडताना आत्मविश्वास, प्रेझेंटेशन स्किल्स आणि विचारांची मांडणी या बाबींमध्ये निश्चितच प्रगती केली. वर्ग अंतर्गत फेरीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शाळा अंतर्गत फेरीत सहभागी होता येणार आहे. कोशिश फाउंडेशनच्या पुढाकाराने आणि अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळांमध्ये अशा स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. याबद्दल विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी फाउंडेशनचे विशेष आभार मानले.

भाजप युवा मोर्चा, कळंबोली अध्यक्ष गौरव नाईक म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व ही केवळ स्पर्धा नसून व्यक्तिमत्व विकासाचं साधन आहे. मी श्री. परेश ठाकूर साहेब व कोशिश फाउंडेशनचे आभारी आहे. या वर्ग अंतर्गत फेरीमुळे शाळांमधील विद्यार्थ्यांना समान संधी मिळत असून 'स्वतःला व्यक्त करण्याची कला' शिकवणारी ही स्पर्धा खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या विकासाचा मजबूत पाया ठरते. शाळेतील शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थ्यांच्या उत्तम प्रतिसादामुळे स्पर्धा यशस्वी झाली असून, पुढील फेरीसाठी विद्यार्थ्यांमध्ये नवा जोश निर्माण झाला आहे.

> **आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेमुळे शाळेतील मुलांना व्यक्त होणे आणि शिकण्यासाठी उत्तम व्यासपीठ मिळाले आहे. अशी संधी शाळांपर्यंत पोहचवणं हे खरं सामाजिक काम आहे. ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला आणि व्यक्तिमत्व विकासाला मोठी चालना देणारी आहे. आमदार प्रशांतदादा ठाकूर व कोशिश फाउंडेशनचे अध्यक्ष तथा माजी सभागृह नेते पनवेल महानगरपालिका यांचे अभिनंदन करतो.**
> **–अमर पाटील, अध्यक्ष, भाजप कळंबोली मंडल**

# खारघरमध्ये उद्यान विभागामार्फत वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका उद्यान विभाग आणि रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई सनराईस यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि.१४) खारघर येथील सेक्टर ७ जवळील रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करण्यात आले.



पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महापालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे. या कार्यक्रमांतर्गत रस्त्याच्याकडेला करंज, कदंब अशा २५ वृक्षांचे रोपण करण्यात आले.

सहा. आयुक्त डॉ. रूपाली माने व उद्यान विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागातील उद्यान पर्यवेक्षक नितीन राठोड, रुपेश चित्रुक, सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक वैभव ठाकरे यांचे या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

# भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते वाजे येथे मोफत वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून सात्यत्याने विविध शैक्षणिक उपक्रम राबवून गरजूंना मदत करण्यात येते. त्यानुसार पनवेल तालुक्यातील वाजे येथील वाजे हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये गरजू विद्यार्थ्यांना वह्या वापटचा कार्यक्रम सोमवारी आयोजीत करण्यात आला होता.



या कार्यक्रमाला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदशरन केले तसचे वह्याचे वाटप केले. या कार्यक्रमाला भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, नेरे मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरसपंच आनंद ढवळे, प्रधान पाटील, तालुका चिटणीस यतीन पाटील, माजी सरपंच राजेंद्र भालेकर, श्याम भालेकर, राजेश भोइर, पदू वाघ, तंटामुक्ती अध्यक्ष राघो पाटील, शशिकांत भगत, अंबाजी पाटील, मेघनाथ भगत, मदन पाटील, गणेश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**पनवेल : भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक, जनरल कामगार युनियनच्या पेण तालुका महिला अध्यक्षपदी सुवर्णा माळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक, जनरल कामगार युनियनचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष संजय भगत, माजी उपसरपंच वंदना प्रकाश भोपी, वंदना संतोष माळी, रूतीका माळी आदी उपस्थित होते.**



# श्रावण क्वीन स्पर्धेत वेदा केळकर विजेती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'पनवेल स्मार्ट मॉमिज' आणि 'आयडब्ल्यूसी गॅलेक्सी न्यू पनवेल' यांच्या संयुक्त विद्यमाने श्रावण क्वीन ही सौंदर्य आणि सांस्कृतिक स्पर्धा शनिवारी (दि.१२) मोठ्या उत्साहात झाली. पनवेलमधील गणपती मंदिर सभागृहात ही स्पर्धा रंगली. या कार्यक्रमाची संकल्पना शीतल ठाकूर यांची होती, तर संयोजनाची धुरा कविता ठाकूर यांनी यशस्वीपणे सांभाळली.



स्पर्धेत विविध गुणदर्शनाच्या आधारे निवड झालेल्या विजेत्यांमध्ये वेदा केळकर हिने 'श्रावण क्वीन' हा मान मिळवला. डॉ. अनुश्री डिंगोकर हिला फर्स्ट रनरअप, तर वर्षा वाणी हिला सेकंड रनरअप म्हणून गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून शकुंतला रामशेठ ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, प्रीती जॉर्ज म्हात्रे, माधुरी गोसावी, अनुराधा ठोकळ, लीना पाटील आदी उपस्थित होत्या.

या उपक्रमातून महिलांना आपली कला, आत्मविश्वास व व्यक्तिमत्व सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळाले. या उपक्रमाचे पनवेल परिसरात विशेष कौतुक होत आहे.




# रोटरी क्लब खारघर मिडटाऊनतर्फे डॉक्टरांचा सन्मान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब खारघर मिड टाऊनतर्फे रविवारी (दि.१३) समाजासाठी आपली मौल्यवान सेवा देणाऱ्या खारघर आणि परिसरातील विविध तज्ञ डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला.



या वेळी डॉ. राजेंद्र वाघेला यांनी आपल्या व्याख्यानात जन्मतःच बहिरेपणावर प्रकाश टाकला. आईच्या पोटात बाळ असताना काही कॉम्प्लीकेशन जस की रुबेला किंवा मधुमेह झाला तर जन्माला येणार बाळ जन्मतःच बहिरेपण घेऊन येते आणि हे पालकांच्या लवकर लक्षात येत नाही आणि जर ऐकायला येत नसेल तर मूल बोलायला शिकत नाही. त्याची भाषा विकसित होत नाही. आणि त्यामुळे या मुलांचा विकास सर्वसाधारण मुलांसारखा होत नाही. खूप वेळा अशी मुले शिक्षणापासून वंचित राहतात. भारतात या प्रकाराच्या आजाराचे १००० मुलांमध्ये आठ मुले इतके मोठे प्रमाण आहे.

यावर cochlear implant ही शस्त्रक्रिया करून मूल ऐकू शकते आणि नंतर थेरपी दिल्यानंतर छान बोलूही शकते. जितक्या लवकर हे बहिरेपण कळले आणि उपचार झाले तितका या शास्त्रक्रियेचा फायदा अधिक होतो, पण बाळाला ऐकु येत नाही हे कळण्यासाठी पालकांना, आशा सेविका, आरोग्य सेविका, शिक्षक यांना याची माहिती असणे आवश्यक आहे.

या शस्त्रक्रिया साठी येणारा खर्च खूप आहे आणि बर्याच वेळा अशा मूक बाधिर मुलांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती चांगली नसते त्यामुळे समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे यावे व सहकार्य करावे जेणेकरून मुल ऐकू व बोलू शकतील व त्यांचे आयुष्य सुखकर होईल, असे आवाहन केले आहे.

## संपादकीय

# आताच निष्कर्ष नकोत

एअर इंडियाच्या विमानाला अहमदाबाद येथे झालेल्या अपघाताचा तपास करणाऱ्या 'विमान अपघात तपास विभागा'ने (एएआयबी) प्राथमिक अहवाल शनिवारी प्रसिद्ध केला. अपघातग्रस्त विमानाच्या दोन्ही इंजिनांचा इंधनपुरवठा एका सेकंदाच्या फरकाने बंद झाला होता असे अहवालात म्हटले आहे. मात्र हे कसे झाले किंवा कोणी केले याबद्दल अहवालात माहिती नाही. अहवाल प्राथमिक असल्याने आताच निष्कर्ष काढण्याची घाई करायला नको. अंतिम अहवालात ठोस माहिती मिळेपर्यंत थांबणेच उचित ठरेल.

**अहमदाबाद विमान अपघाताचा प्राथमिक तपास अहवाल आला असून एअर इंडियाच्या अपघातग्रस्त बोइंग ७८७-८ ड्रीमलाइनर विमानाची दोन्ही इंजिने उड्डाणानंतर काही सेकंदातच बंद पडल्याने हा अपघात झाला असे या अहवालात म्हटले आहे. इंधनपुरवठा बंद होण्याची कारणे अद्याप तपासाधीन आहेत. इंधनपुरवठा बंद झाल्यानंतरचा कॉकपिटमधील संवादही समोर आला आहे. अहवालात म्हटले आहे की एका वैमानिकाने दुसऱ्या वैमानिकाला विचारले की तू इंधनपुरवठा का बंद केलास? त्यावर दुसऱ्या वैमानिकाने, मी तसे काही केले नाही असे उत्तर दिले. अहवालानुसार इंधनपुरवठा करणारी दोन्ही बटणे, जी इंजिन बंद करण्यासाठी वापरली जातात, ती विमानाने उड्डाण केल्यानंतर जवळपास लगेचच कटऑफ स्थितीत गेली होती. मात्र हे कसे वा का घडले याचा अहवालात उल्लेख नाही. बोइंग विमानांमधील या फ्युएल स्विचबाबतीत अमेरिकेतील फेडरल एव्हिएशन डमिनिस्ट्रेशन (एफएए) यंत्रणेने २०१८ मध्ये सावधगिरीचा इशारा दिला होता. विमानातील कंट्रोल स्टँडवर इंधन अर्थात फ्युएल स्विच असते. या स्विचच्या चालू-बंद अवस्थेत कोणतीही हलगर्जी होऊ नये यासाठी त्याला लॉकिंग सुविधा देण्यात आली होती. फ्युएल स्विच सुरु करण्यासाठी वैमानिकाला ते अनलॉक करून मग ते वर उचलत रन किंवा कटऑफ स्थितीकडे फिरवता येत असते. मात्र हे स्विच लॉक केलेले नसेल तर ते सहज फिरवता येत होते. लॉकिंग यंत्रणेतील ही त्रुटी एफएएने अधोरेखित केली होती. फ्युएल स्विच अनलॉक झाल्याने ते अनवधानाने चालू-बंद होऊ शकते. तेव्हा बोइंगने या त्रुटी तातडीने दूर कराव्यात व सर्व विमान कंपन्यांनी या स्विचच्या पद्धतीची खातरजमा करून घ्यावी असे एफएएने म्हटले होते. अहमदाबाद विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये उड्डाणानंतर लगेचच त्या विमानाचे रॅम एअर टर्बाइन (रॅट) कार्यान्वित झाल्याचे दिसून आले होते. दहा सेकंदांनी फ्युएल स्विच सुरू केल्यानंतर इंजिन १ला इंधन पुरवठा सुरू झाला. त्यानंतर चार सेकंदांनी इंजिन २चे स्विच सुरू स्थितीत आले. दोन्ही इंजिने सुरू करण्यात वैमानिकांना यश आले. परंतु एकच इंजिन पूर्ण क्षमतेने सुरू झाले तर दुसऱ्या इंजिनाला पुरेशी ऊर्जा मिळाली नाही. परिणामी विमानाला पुन्हा गती मिळवण्यात यश आले नाही. उड्डाणाचे वेळी सहवैमानिक विमान उडवत होता तर कॅप्टन निरीक्षकाच्या भूमिकेत होता. अपघातस्थळी दोन्ही इंधन स्विच सुरू स्थितीत आढळली होती. या प्राथमिक अहवालावर पायलट संघटनेने नाराजी व्यक्त केली आहे. यात वैमानिकांना थेट दोष दिला नसला तरी त्यांच्याकडे बोट दाखवले जात आहे असे त्यांचे म्हणणे आहे. अर्थात अन्य अतिरिक्त पुरावे व माहितीचा आढावा घेऊनच अंतिम अहवाल सादर होईल. त्यामुळे आताच निष्कर्ष काढणे योग्य नाही हे केंद्रीय हवाई वाहतूक मंत्र्यांचे म्हणणे योग्यच आहे.**

# ज्ञान, अनुभव, समयसूचकता, प्रसंगावधानाने मृत्यूलाही देता येते हुलकावणी

अहमदाबादहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान १२ जून २०२५ रोजी उड्डाणानंतरच कोसळले. या दुर्घटनेत २७५ जणांचा मृत्यू झाला. अहमदाबाद विमानतळावरून विमानाने उड्डाण घेतलं आणि काही सेंकदात दोन्ही इंजिन्सना इंधन पुरवठा बंद झाल्यामुळे इंजिन ला टेक-ऑफसाठी लागणारा इंधन पुरवठा कमी पडू लागला. पायलट सुमित सभरवाल यांनी एटीला मेडेचा एमर्जन्सी मेसेज पाठवला होता. पण तेवढ्यात सर्व संपलं होतं. सभरवाल यांचा नंतर संपर्क झालाच नाही.

वर्षापुर्वी मुंबईत असाच एक प्रसंग निर्माण झाला होता पण ज्ञान, अनुभव, समयसूचकता, प्रसंगावधान, आणि कामाप्रति समर्पण या मुळे अगदी जवळ आलेल्या मृत्यूलाही हुलकवणी देण्यात यश मिळाले होते

मुरादाबाद येथील एका रुग्णास असाध्य आजार झाला होता.सर्व उपाय थकल्यावर शेवटी lungs transplant हा एकच उपाय शिल्लक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.अशी शस्त्रक्रिया मुंबईत चांगल्या प्रकारे होत असल्याने रुग्णास मुंबईला हलवावे असे ठरले. पण रुग्ण अत्यवस्थ असल्याने एअर रुग्णवाहिका म्हणजे विमानानेच हलवावे असे ठरले.मग जेट एअरवेजची रुग्णवाहिका पक्की केली व रुग्णास घेऊन ते विमान मुंबईकडे रवाना झाले खरे, पण भविष्यात कोणते ताट नियतीने आपल्यासाठी वाढून ठेवले आहे याची कोणालाच कल्पना नव्हती!

त्या विमानाचे चालक होते कॅप्टन केसरी सिंग. अत्यंत कुशल, अनुभवी व असामान्य धीराचे वैमानिक असा त्यांचा लौकिक आहे..मुरादाबादहुन निघाल्यावर मुंबईत पॅसेंजरला सोडायचे, परत येताना पुण्यात पेट्रोल भरून परतायचे असा त्यांचा प्लॅन होता.पण त्या प्लॅनला खो बसला. पुण्याची हवा खराब होती. कदाचित लँडिंग होऊ शकले नसते. मग केसरी सिंगानी विचार केला आणि वाटेतच असलेल्या नागपूर विमानतळावर पेट्रोल भरावे असे ठरले व तशी परवानगीही त्यांना मिळाली. त्यांनी थोडा विचार करून थोडे अधिकच पेट्रोल भरले.

नागपूर विमानतळावर रविकांत अवला या सेंट्रल इंड्स्ट्रियल सिक्युरिटी फोर्स चे हेड कॉन्स्टेबल ड्युटीवर होते. त्या दिवशी watch tower वर ड्युटी देत होते. रनवे, येणारी जाणारी विमाने, आणि आजूबाजूला होणाऱ्या हालचाली, घडामोडी यावर लक्ष ठेवणे हे त्यांचे काम असते.

त्या दिवशी साधारण साडेपाच वाजता अवला यांनी एक विमान take off करताना पाहीले. त्या आधीही त्यांनी ती एअर रुग्णवाहिका लँड होताना पाहिली होती. सवयीप्रमाणे त्यांनी त्या विमानाला दूर पर्यंत जाई तो पाहीले आणि अचानक त्यांना ती गोष्ट दिसली.त्या विमानातून एक वस्तू अचानक खाली पडली!

हे कसे शक्य आहे? विमान फारतर ४०० मीटर दूर गेले असेल. त्याने ताबडतोब कंट्रोल रूमला ही बातमी कळवली.कंट्रोल रूम मधील अधिकाऱ्याचा या माहितीवर विश्वास बसला नाही. पण त्यांनी हलगरजीपणा न करता त्या वैमानिकाला म्हणजे आपल्या केसरी सिंग यांना कॉन्टॅक्ट करून तुमची वस्तू पडली आहे काय हे विचारले. त्यांनी पाहणी करून असं काही नसल्याचं सांगितले.

पण आपल्या कॉन्स्टेबल अवला यांचे समाधान झाले नाही. ही काही साधारण घटना नाही हे त्यांना जाणवत होते. त्यांनी आपले काम बाजूच्या सहकाऱ्यावर सोपवले आणि आपली बाईक घेऊन ती पडलेली वस्तू शोधण्यासाठी निघाले.थोडया दुरवर गेल्यावर त्यांना ती वस्तू दिसली. ते चक्क त्या विमानाचे टायर होते!त्यांनी त्या टायरचा फोटो घेतला व कंट्रोलरूमला कळवले.

कंट्रोल रूमने ताबडतोब तो फोटो कॅप्टन केसरीसिंग यांना पाठवला व हे टायर तुमच्या विमानाचे आहे काय हे विचारले.केसरीसिंग यांनी तो फोटो विमानाच्या कंपनीला पाठवला व हे टायर आपलेच आहे काय ते विचारले.



कंपनीने होकार दिला.विमान हवेत गेले की त्याची चाके आपोआपच पोटात जातात. हवेशी घर्षण होऊन झिज टाळावी व वेगावर परिणाम होऊ नये म्हणून ही व्यवस्था असते.

आता कॅप्टन केसरी सिंग यांना विमानाचे बेली लॅडींग म्हणजे ते विमान चक्क पोटावरच उतरावे लागणार होते!होय.ही बेली लॅडींग ही अतिशय भयानक गोष्ट असते.यात विमान आणि जीव वाचण्याची शक्यता शून्य असते.

कॅप्टन केसरी सिंग यांच्या माहितीनुसार त्यांना माहीत असलेल्या सगळ्या लशश्रश्रू श्ररपवळपस मधील व्यक्ती या मरणच पावल्या होत्या.पण केसरीसिंग हे धिरोदात्य व्यक्तिमत्व आहे.त्यांनी शांतपणे एक एक निर्णय घेण्यास सुरुवात केली. अशावेळी न डगमगता मृत्यू समोर नक्की असताना केवळ लॉजिकल निर्णय घेण्यास फार महान प्रज्ञा लागते.विमानाला चाक नव्हते. आत अतिगंभीर रुग्ण होता, डॉक्टर होते, नातेवाईक होते, कोपायलट होता. सर्वांचे प्राण वाचवायचे होते.तोपर्यंत विमान औरंगाबाद पर्यंत आले होते.

कॅप्टन आता अशा विषयातील कोण तज्ञ आहे त्यांची नावे आठवू लागले. आणि त्यांना नाव आठवले. कॅप्टन हीर! त्यांनी टॉवरला कॅप्टन हीर यांच्याशी संपर्क करून द्यायला सांगितले..

कॅप्टन हीरना ते जिथे असतील तेथून जवळच्या विमानातळावर जाण्याचा आदेश निघाला.ते बिचारे सुट्टीवर होते. पण त्यांनी धावतपळत राऊरकेला विमानतळ गाठलं.मग दोघे मिळून एक एक निर्णय घेऊ लागले. विमानात भरपूर इंधन भरले गेले होते. इतक्या इंधनासकट लँड झाल्यास निश्चितपणे स्फोट झाला असता. तेव्हा आधी इंधन संपवावे लागणार होते. ते काही फेकता येत नसते. मग ते वापरूनच संपवावे लागले असते. म्हणजे ते विमान चक्क अजून अडीच तास हवेतच फिरवावे लागणार होते.

पण तेही सोपे नसते. तितके फिरवायला जागा लागते.इतर विमानांचे टायमिंग तपासावी लागतात. मुंबईत दर मिनिटाला एक विमान उतरत वा चढत असते. त्यांचे काय करायचे?शिल्लक इंधन आणि उतरण्याच `टायमिंग याचे गणित मोठे अवघड असते. तेही जुळवावे लागणार होते.शेवटी विमान दोन तास फिरवण्यास जागा आणि वेळ दिली गेली.आपले टायर खरंच निखळले आहे काय याची केसरसिंग यांना खात्री करायची होती. मग त्यांनी खाली कंट्रोल टॉवरला निरोप दिला की मी एकदा एकदम खालून एक फेरी मारतो. २०० मीटर वरून. तुम्ही खालून पाहून मला सांगा.

खालून दुर्बीण लावून पाहून टॉवरने निरोप दिला की, होय टायर निखळले आहे.इंजिन फिरत ठेऊन पेट्रोल जाळणे सुरु झाले. एका ठराविक उंचीवर आले की विमानाची दोन्ही इंजिन्स बंद करायची, सर्व इलेक्ट्रॉनिक्स यंत्रणा बंद करायच्या अशा सूचना होत्या. त्यामुळे आग लागण्याची शक्यता थोडीशी कमी होत होती.इकडे फायर ब्रिगेड, आपत्कालीन व्यवस्था कामास लागली. खास ॲम्ब्युलन्स आणली गेली. CI-SF चे जवान धावपट्टीच्या दोन्ही बाजूस तैनात झाले. कॅप्टन विमान लँड करण्यासाठी तयार झाले आणि परत एक संकट आले.विमानाचे हेड लाइटस हे टायर आत बाहेर करणाऱ्या यंत्रणेशी संलग्न असतात. टायर बाहेर आले की ते आपोआप चालू होतात. पण इथे टायरच बाहेर काढायचे नव्हते. त्यामुळे हेड लाइटस चालूच होणार नव्हते. मग अंधारातच लँडिंग करण्याचे ठरले.मग बाकीचे सारे लाइट्स बंद करून तितकीच धावपट्टी उजळून काढली. संपूर्ण धावपट्टीवर आगविरोधक फोम टाकण्यात आले.त्याशिवाय फोम फवारा करणाऱ्या गाड्या आणि पाणी फवारणाऱ्या अग्नीशमन दलाच्या गाड्या धावपट्टीवर आणल्या.

त्यांना विमान लँड होताच विमानासोबतच फवारणी करत धावायचे होते!केवळ दहा सेकंद बाकी होते. आणि तो संदेश आला. 'The bird is landing'. इतकी विपरीत परिस्थिती असतानाही दोन्ही इंजिन्स बंद असतानाही कॅप्टन केसरीसिंग यांनी अगदी बरोबर अचूक, धावपत्तीच्या मध्यभागी लँडिंग केले. बेली लॅडींग चे पण एक टेक्निक असते. त्यात विमान लँड होताच विशिष्ट अँगलने ठेवावे लागते. त्या टेक्निकचा वापर त्यांनी लँड होताच केला. विमान घसरत घसरत एक किलोमीटर पुढे गेले. त्याला समांतर अशा अग्नीशमन दल आणि फोम फवारणाऱ्या गाड्या त्याच वेगाने फवारणी करत धावत होत्या.अखेर विमान थांबले. पण फवारणी सुरूच होती.सारे श्वास रोखून पहात होते. विमानास आग लागली नव्हती! ना स्फोट झाला होता! मग हळूच दार उघडण्याचे आदेश दिले.

आतल्या रुग्णास प्रथम बाहेर काढण्यात आले. त्याची रवानगी रुग्णवाहिकेतून नानावटी रुग्णालयात झाली. मग प्रथम डॉक्टर, नातेवाईक उतरले. मग को- पायलट आणि सर्वात शेवटी... कॅप्टन केसरीसिंग!!

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# यूट्यूबवरून पैसे कमवणे होणार अवघड

यूट्यूब आता आपल्या कमाईच्या धोरणात एक मोठा बदल करत आहे, ज्यामुळे सतत तेच तेच किंवा एआय द्वारे तयार केलेले व्हिडीओ बनवणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. हा बदल १५ जुलैपासून लागू होणार आहे. पुनरावृत्ती कंटेंट' ओळखण्यासाठी आणि तपासण्यासाठी आपल्या मॉनिटायझेशन धोरणात सुधारणा करण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. 'ओरिजिनल' आणि 'ऑथेंटिक' कंटेंट अपलोड करण्याची मागणी क्रिएटर्सनी नेहमीच केली आहे, असे कंपनीने अधोरेखित केले, त्यामुळे कंटेंट क्रिएटर्सच्या कमाई धोरणावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.





**कोणाला सर्वात जास्त धोका आहे?**

जे क्रिएटर्स ऑटोमेटेड व्हिडीओंवर जास्त अवलंबून असतात त्यांना याचा फटका बसू शकतो. यामध्ये एआय व्हॉइसओव्हर वापरणारे चॅनेल, बेसिक स्लाईड शो व्हिज्युअल किंवा थोड्याफार फरकासह पुन्हा पुन्हा त्याच फॉरमॅटचे अनुसरण करणारे व्हिडीओ समाविष्ट आहेत. हे प्रकार विशेषतः यूट्यूब शॉर्ट्समध्ये सामान्य झाले आहे आणि काही अहवालांनुसार आता ४० टक्क्यांहून अधिक शॉर्ट्समध्ये काही प्रमाणात एआय समाविष्ट आहे. यूट्यूब एआयवर बंदी घालत नाही, परंतु ते एक स्पष्ट संदेश पाठवत आहे. जर तुमचा मजकूर कोणत्याही वैयक्तिक प्रयत्नाशिवाय किंवा क्रिएटीव्हीटीशिवाय मशीनने बनवला आहे असे वाटत असेल, तर ते आता कमाईसाठी पात्र ठरणार नाही.

**कोण सुरक्षित आहे?**


जर तुम्ही तुमच्या व्हिडीओंमध्ये दिसत असाल, स्वतः च्या आवाजात बोललात किंवा तुमचे व्यक्तिमत्व आणि कल्पना कंटेंटमध्ये आणत असाल तर तुम्ही सुरक्षित आहात. यूट्यूबने स्पष्ट केले की, जे एआयचा वापर करत नाहीत, स्वत: मेहनत घेऊन कंटेट तयार करतात, अशा क्रिएटर्सना याचा फटका बसणार नाही.म्हणून जर तुम्ही एक्स्प्लेनर कंटेट, ट्युटोरियल्स, प्रतिक्रिया किंवा कोणत्याही प्रकारचे व्हिडीओ तयार केले, जिथे तुमचा आवाज किंवा तुम्ही स्वत: उपस्थित असाल, तर तुमचा कंटेंट वेगळा दिसण्याची शक्यता जास्त असू शकते. कमाईसाठी मूलभूत आवश्यकता मात्र बदललेल्या नाहीत.

# विचारवंत, वक्ते प्रा. शिवाजीराव भोसले

महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ विचारवंत, व्यासंगी लेखक व सुप्रसिद्ध वक्ते शिवाजीराव अनंतराव भोसले यांचा जन्म १५ जुलै १९२७ रोजी खटाव तालुक्यातील कलेढोण (सातारा जिल्हा) येथे अनसूयाबाई व अनंतराव या दांपत्यापोटी झाला. अनंतराव प्राथमिक शिक्षक होते, तर आई गृहिणी होत्या. वडिलांकडून त्यांना अमोघ वक्तृत्वाची देणगी मिळाली. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण कलेढोण व विटा येथे झाले.

माध्यमिक शिक्षण त्यांनी साताऱ्यात घेतले. बॅ. पी. जी. पाटील, शंकरराव खरात व डॉ. दत्ताजीराव साळुंखे हे तीन माजी विद्यापीठ कुलगुरू त्यांचे बोर्डिंगमधील सहाध्यायी होते. विद्यार्थिदशेत असताना कर्मवीर भाऊराव पाटील, वेदमहर्षी सातवळेकर, श्री. म. माटे, प्रा. प्र. रा. दामले, प्राचार्य सोनोपंत दांडेकर प्रभृतींचा त्यांच्यावर विलक्षण प्रभाव पडला. त्यातून त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली.

सुरुवातीस त्यांनी काही काळ साताऱ्यात वकिली केली. पुढे त्यांनी मुधोजी महाविद्यालय, फलटण येथे १९५७ ते १९८८ पर्यंत तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून अध्यापन केले. याच महाविद्यालयात १९६३ ते १९८८ असे सलग २५ वर्षे ते प्राचार्य होते. निवृत्तीनंतर १९८८ ते १९९१ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे



## निमित्त

(औरंगाबाद) ते कुलगुरू होते. ते तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र व मानसशास्त्र हे विषय शिकवत. त्यांनी स्वामी विवेकानंद, श्री अरविंद, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा फुले, रवींद्रनाथ टागोर आदी थोर व्यक्तींच्या चरित्राचा अभ्यास केला, शिवाय महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वर, स्वामी चक्रधरांपासून ते संत गाडगेबाबांपर्यंतच्या संतांचाही त्यांचा व्यासंग होता. स्वामी विवेकानंदांच्या जन्मशताब्दीनिमित्त (१९६३) महाराष्ट्रभर त्यांनी व्याख्याने दिली. त्या वेळेपासून अखेरपर्यंत संपूर्ण महाराष्ट्र तसेच गोवा, इंदूर, हैदराबाद (दक्षिण), बंगळूरू इत्यादी ठिकाणी त्यांनी असंख्य व्याख्याने दिली. पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत १९६९ ते १९९७ या काळात सतत अठ्ठावीस वर्षे व्याख्याने देण्याचा विक्रम त्यांनी प्रस्थापित केला. याशिवाय त्यांनी अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथील मराठी साहित्य संमेलन आणि बृहन्महाराष्ट्र मंडळ ऑफ नॉर्थ अमेरिका यांच्या द्वैवार्षिक स्नेहसंमेलनासाठी दोन वेळा अमेरिकेला भेटी दिल्या. त्या वेळी न्यू जर्सी, कॅलिफोर्निया, लॉस अँजेल्स, न्यूयॉर्क येथे त्यांनी व्याख्याने झाली. स्वामी समर्थांच्या पादुका नेणाऱ्या समितीसोबत ते १९९८ला सिंगापूरला गेले. त्या निमित्ताने त्यांनी रामदासांवर तिथेही व्याख्यान दिले. त्यांच्या व्याख्यानात थोर पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाचा अंश असे, त्यांच्या विचाराचे विश्लेषण असे आणि त्यांच्या कार्याची-प्रबोधनाची मीमांसा असे. त्यांना अनेक मानसन्मान लाभले.

शिवाजीरावांच्या गंगौघासारख्या वक्तृत्वशैलीबद्दल डॉ. रघुनाथराव माशेलकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, सेतुमाधवराव पगडी, पु. ल. देशपांडे प्रभृती मान्यवरांनी गौरव उद्गार काढले आहेत. त्यांचे विचार माणसामध्ये उच्च दर्जाची प्रेरणा निर्माण करतात. त्यांची वक्तृत्वशैली गंगा प्रवाहासारखी प्रसन्न व पवित्र भावना जागृत करणारी आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या सार्वत्रिक जीवनात स्वत:चे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात






## आरोग्य प्रहर

# वरण-भातावर 'हा' पदार्थ घालून खा

प्रत्येक घरात वरण बनवण्याची पद्धत वेगवेगळी असते. काही लोक सांबारमध्ये भरपूर भाज्या घालून डाळ शिजवतात तर काहीजण फक्त तूप आणि जीऱ्याची फोडणी देऊन डाळ शिजवतात. काहींना फोडणी देऊन वरण-भात खायला आवडतो. डाळ आपल्या आहाराचा एक महत्वपूर्ण भाग आहे. प्रथिने आपल्या शरीराचा आधारस्तंभ म्हणून ओळखली जातात आणि डाळ हे प्रथिनांचे सर्वात महत्वाचे स्रोत म्हणून ओळखले जातात, विशेषतः शाकाहारी आहारासाठी. पण त्याच डाळी वारंवार खाल्ल्याने कंटाळवाण्या होऊ शकतात. मात्र तुम्ही तुमच्या डाळीत थोडे लिंबू पिळून ते बदलू शकता, ज्यामुळे डाळीला अधिक चव मिळेलच, शिवाय तुमच्या रोजच्या जेवणाचे पौष्टिक मूल्यही वाढेल. ते कसे पाहूया!



**व्हिटॅमिन सीचा स्रोत**

लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे तुमच्या रोगप्रतिकारक शक्तीला आधार देते आणि तुमची त्वचा निरोगी ठेवते. एका लिंबूमध्ये सुमारे ३१ मिलीग्राम व्हिटॅमिन सी असते, जे शिफारस केलेल्या दैनंदिन सेवनाच्या ५१% आहे, असे सल्लागार आहारतज्ज्ञ आणि मधुमेह शिक्षक कनिक्का मल्होत्रा म्हणाल्या.

लिव्हर आणि किडनी कधीच खराब होणार नाही! कोलेस्ट्रॉलही होईल कमी; फक्त असे करा कोथिंबीरीचे सेवन, तज्ज्ञांनी दिली माहिती

डाळीमध्ये लिंबू घालल्याने पचनक्रिया चांगली होते, ज्यामध्ये भरपूर फायबर असते. कारण लिंबूमधील सायट्रिक आम्ल पोटातील आम्ल उत्पादन वाढवून पचनक्रिया वाढवते, ज्यामुळे अन्नाचे विघटन होण्यास मदत होते आणि पोषक तत्वांचे शोषण सोपे होते.

अँटिऑक्सिडंट गुणधर्म

लिंबूमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि इतर अँटिऑक्सिडंट्स असतात जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह ताणाशी लढण्यास मदत करतात,. या अँटिऑक्सिडंट गुणधर्मामुळे दीर्घकालीन आजारांचा धोका कमी होण्यास मदत होऊ शकते.

किडनीच्या आरोग्यास प्रोत्साहन देतेलिंबूमधील सायट्रिक आम्ल मूत्रातील सायट्रेटची पातळी वाढवून किडनी स्टोन रोखण्यास मदत करू शकते, स्टोन तयार होण्यास प्रतिबंध करू शकते. हे विशेषतः ज्यांना किडनी स्टोन होण्याची शक्यता असते त्यांच्यासाठी फायदेशीर आहे.

# केंद्र सरकारच्या योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करा -खा. श्रीरंग बारणे

**रायगड : रामप्रहर वृत्त**

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांची जिल्हा प्रशासनाने काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.यामध्ये कोणताही हजगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही असे निर्देश दिशा समितीचे अध्यक्ष खासदार श्रीरंग बारणे व सहअध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी दिले.




रायगड जिल्ह्यातील केंद्रीय योजनांच्या प्रगती आढावा घेण्यासाठी सोमवारी जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण अर्थात 'दिशा' समितीची बैठक नियोजन समिती सभागृहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी खासदार श्रीरंग बारणे तर सह अध्यक्षस्थानी खा. सुनील तटकरे हे होते. बैठकीला खा. धैर्यशील पाटील, आ महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आचल दलाल, पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे,अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत प्रधानमंत्री ग्राम सडक योजना आणि मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामांचा आढावा घेण्यात आला. अनेक कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. या प्रकरणी दोषी असणाऱ्या ठेकेदारावर काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात यावी तसेच आवश्यकते नुसार फेर निविदा करण्यात यावी असे निर्देश खा. तटकरे यांनी यावेळी दिले. तसेच ही सर्व कामे प्राधान्य क्रमाने पूर्ण करावीत.

सर्व सामान्यांना पाणीपुरवठा,आवास, शिक्षण, आरोग्य, त्याचप्रमाणे इतर सुविधाही विविध योजनांच्या माध्यमातून मिळवून देण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासन प्रयत्नशील आहे. सर्व विभाग, यंत्रणांनी जबाबदारीने काम करावे असे खा बारणे यांनी सांगितले. केंद्र शासनाच्या सर्व योजनांची जिल्ह्यात प्रभावी प्रसिद्धी करण्यात यावी. मोक्याच्या व प्रत्यक्ष लाभाच्या ठिकाणी ठळक पणे योजना माहिती व लाभार्थी निकष लावावेत अशा सूचनाही श्री बारणे यांनी जिल्हा प्रशासनास दिल्या.

राष्ट्रीय सामाजिक मदत कार्यक्रमंतर्गत जिल्हा आरोग्य प्रशासनाने दिव्यांग मेळावे आयोजित करून लाभ द्यावे असे निर्देश मागील बैठकीत दिले होते. परंतु त्याची पूर्तता न झाल्याने सर्व लोक प्रतिनिधी यांनी नाराजी व्यक्त केली. तात्काळ हे मेळावे आयोजित करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी व आरोग्य विभागास दिल्या.

संजय गांधी निराधार योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना मधील दिव्यांग लाभार्थी यांचा देखील समावेश असावा असेही खा तटकरे यांनी यावेळी सांगितले.

स्वच्छा भारत मिशन ग्रामीण अंतर्गत सार्वजनिक शौचालय यांचे उद्दिष्ट वाढविण्याबाबत निर्देश दिले होते त्याप्रमाणे या वर्षासाठी १५०० वैयक्तिक व १५० सार्वजनिक शौचालय उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. पनवेल तालुक्यातील आणि एकूणच सर्व ग्रामपंचायत हद्दीतील घनकचरा व्यवस्थापनावर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन प्रकल्प राबवावेत. तसेच जिल्ह्याला डेव्हलोपमेंट चार्जेस मिळाले तर त्यामधून जिल्हा विकासाला त्याचा फायदा होईल यावरही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. तसेच विविध कंपन्याकडे सि एस आर निधी असतो हा निधी त्यांनी संबंधित कार्यक्षेत्रात देखील खर्च करण्याबाबत कळवावे असेही खा श्री बारणे यांनी सांगितले.

यावेळी पाणी पुरवठ्याच्या सर्व योजनावर सविस्तर चर्चा झाली. या योजनाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधिताना देण्यात आले.प्रधानमंत्री आवास योजनेतर्गत बँका परस्पर कर्ज कपात करीत आहेत त्यांनी ही कपात तात्काळ थांबवावी असेही निर्देश श्री बारणे यांनी दिले.खासदार धैर्यशील पाटील यांनी कांदळवन आणि बी एस एन एल नेटवर्क टॉवर या विषयी सविस्तर चर्चा केली.

---

## उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगांव, जि. रायगड यांजकडून

## अधिसूचना

क्र.उविअ/भूसं/कात-२/रो.मा.औ.क्षे./जावटे/एस. आर. ६०/२०११- ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ३) चे कलम १, पोट कलम (३) अन्वये महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. २००७/(३३४) उद्योग १४ अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे त्या अधिसूचनेच्या अनुसूचित विनिर्दोष्टीत करण्यात आलेल्या क्षेत्रास दिनांक १९ फेब्रुवारी, २००९ पासून लागू करण्यात आले आहेत;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे कलम ३२ अन्वये ज्या क्षेत्रात उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण ६ लागू करण्यात आले आहे, त्या क्षेत्रातील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास औद्योगिक किंवा उपरोक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संपादन करण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनास प्रदान केले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे क्र. आयडीसी/(१८९२)/१७४४१/उद्योग-१४, दिनांक ११ जून १९९३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे क्र. आयडीसी/२१०६/(४८५)/उ-१४, दिनांक १० नोव्हेंबर २००६ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६२ च्या नियम २८ ने जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले उपरोक्त नियमाची कलमे ३२, ३६ व ३८ चे अधिकार आणि नियमाचे कलम २ (क) अन्वये उप विभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांना कार्यान्वित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत :

आणि ज्याअर्थी, सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेले क्षेत्र महामंडळास दिल्ली - मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडोर अंतर्गत रोहा - माणगांव औद्योगिक क्षेत्रासाठी संपादन करण्यात आले असून महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२ (२), ३२(१), ३२(५) व कलम ३२(६) अन्वये कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे, तसेच जमीन मालकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३३ (३) अन्वये सर्वसाधारण / अनिवार्य निवाडे घोषित करून नुकसान भरपाई वाटपाबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे;

त्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२ (७) चा वापर करून अनुसूचित नमूद केलेल्या जमिनी उपरोक्त कारणासाठी संपादीत करून व ताब्यात घेवून ती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांजकडे हस्तांतरण करीत असल्याबाबतची अधिसूचना उपविभागीय अधिकारी माणगांव, उपविभाग माणगाव हे प्रसिध्द करीत आहेत.

**अनुसूची**

**रोहा-माणगांव औद्योगिक क्षेत्र**

**जिल्हा रायगड, ता. माणगांव, मौजे - जावटे**

| अ. क्र. | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | जमिनीचे क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | १ | २ क | ०.१५७० |
| २ | १ | ४ | ०.०६१० |
| ३ | १ | ५ | ०.०७०० |
| ४ | १ | ६अ | ०.०६६० |
| ५ | १ | ६ह पै | ०.००५० |
| ६ | ४ | ४ | ०.०६०० |
| ७ | ४ | ५अ | ०.२००० |
| ८ | ४ | ५ क | ०.२८२० |
| ९ | ४ | ७ | ०.०२३० |
| १० | ४ | १५ | ०.०९६० |
| ११ | ४ | १६ | ०.००८० |
| १२ | ५ | ४ | ०.०१०० |
| १३ | ६ | २ब पै | ०.०३२८ |
| १४ | ६ | २ क | ०.३१२० |
| १५ | ६ | ३ ड | ०.०१०० |
| १६ | ७ | १अ | ०.०१५० |
| १७ | ११ | १ | ०.०१५० |
| १८ | ११ | २इ | ०.००८० |
| १९ | १२ | १ पै | ०.००२० |
| २० | १२ | २/२ (२अ) | ०.०१५० |
| २१ | १२ | ३/३ (३ब) | ०.०५६० |
| २२ | १२ | ३/६ पै (३इ) | ०.००२० |
| २३ | १३ | १ क पै | ०.००१० |
| २४ | १३ | १इ | ०.०१०० |
| २५ | १३ | १ फ पै | ०.०४३८ |
| २६ | १३ | १ ख पै | ०.०३४८ |
| २७ | १३ | ५/५+६+७अ (५ई) | ०.४६०० |
| २८ | १३ | ५/९/८ड (५ग) पै | ०.००९० |
| २९ | १४ | १/७ (१ ज) | ०.०२०० |
| ३० | १४ | ३/२ (३अ) | ०.३०३० |
| ३१ | १४ | ३/३ (३ब) | ०.०५६० |
| ३२ | १४ | ३/४ (३क) | ०.११०० |
| ३३ | १४ | ३/५ (३ड) | ०.११५० |
| ३४ | १४ | ३/७ (३फ) | ०.००८० |
| ३५ | १४ | ३/१० (३ग) पै | ०.००३० |
| ३६ | १६ | २/१ | ०.१८०० |
| ३७ | १६ | २/१० पै (ख) | ०.००१० |
| ३८ | १७ | १/२ (ब) | ०.०१०० |
| ३९ | १७ | १/३ पै (क) | ०.००८० |
| ४० | १७ | १/५. (इ) | ०.०४०० |
| ४१ | १७ | १/६ पै (फ) | ०.००९२ |
| ४२ | १७ | ५ | ०.०४०० |
| ४३ | १९ | पै | ०.१६०० |
| ४४ | २० | १ पै | ०.०३७५ |
| ४५ | २१ | १ पै | ०.००५० |
| ४६ | २३ | १ क | ०.४८३० |
| ४७ | २३ | १ इ पै | ०.००९० |
| ४८ | २३ | १फ पै | ०.००६० |
| ४९ | २३ | १ज पै | ०.००६० |
| ५० | २५ | १ | ०.८९२० |
| ५१ | २६ | ६ पै | ०.०४०० |
| ५२ | २६ | १३ | ०.००८० |
| ५३ | २७ | ५ब पै | ०.००९२ |
| ५४ | २७ | ५ क पै | ०.०००८ |
| ५५ | २७ | ५ड | ०.००५० |
| ५६ | २७ | ५इ | ०.००८० |
| ५७ | २७ | ५फ | ०.००५० |
| ५८ | २९ | २/२ (ब).पै | ०.०३०० |
| ५९ | २९ | २/७. (ग) | ०.०१५० |
| ६० | ३० | १ क | ०.१३०० |
| ६१ | ३० | २अ पै | ०.०३४८ |
| ६२ | ३१ | ३ पै | ०.००१८ |
| ६३ | ३४ | १ क पै | ०.००३४ |
| ६४ | ३४ | १ न | ०.०६०० |
| ६५ | ३५ | १ब पै | ०.१६२० |
| ६६ | ३५ | १ क पै | ०.००२४ |
| ६७ | ३५ | १ ह | ०.०१०० |
| ६८ | ३६ | ३ पै | ०.०६२० |
| ६९ | ३७ | १ब पै | ०.००६० |
| ७० | ३७ | १ क | ०.०१२० |
| ७१ | ३७ | १ फ पै | ०.००६० |
| ७२ | ३७ | १ ज (ग) | ०.०१०० |
| ७३ | ३७ | ५ | ०.०३०० |
| ७४ | ३७ | १२ | ०.०१०० |
| ७५ | ३७ | १८/३ (ब) पै | ०.०२३० |
| ७६ | ३७ | २६ड | ०.०४०० |
| ७७ | ३७ | २६ इ | ०.०१०० |
| ७८ | ३८ | १५ | ०.१७०० |
| ७९ | ३९ | ६ | ०.०२०० |
| ८० | ३९ | १६ पै | ०.१३३४ |
| ८१ | ४० | १६ अ पै (४०/१६अ व ४०/१६/१/१) | ०.६२०० |
| ८२ | ४० | १६ब | ०.१३०० |
| ८३ | ४० | १६ क | ०.०४०० |
| ८४ | ४० | १६ड | ०.०३०० |
| ८५ | ४० | १६ इ | ०.०१०० |
| ८६ | ४० | १६फ | ०.०३०० |
| ८७ | ४० | १९अ पै | ०.०३७५ |
| ८८ | ४० | १९ब पै | ०.२५०० |
| ८९ | ४० | १९ क | ०.०१०० |
| ९० | ४० | १९ड | ०.०४०० |
| ९१ | ४० | १९ इ | ०.०१०० |
| ९२ | ४० | २० | ०.३७०० |
| ९३ | ४० | २२ | ०.११०० |
| ९४ | ४१ | २ ब पै | ०.०१२० |
| ९५ | ४१ | ३ क पै | ०.०२७० |
| ९६ | ४१ | ३ ग पै | ०.११७० |
| ९७ | ४१ | ३ ख पै | ०.०२७० |
| ९८ | ४१ | ४ क पै | ०.०१२० |
| ९९ | ४४ | ३ म पै | ०.०४५० |
| १०० | ४४ | ५ पै | ०.०१५० |
| १०१ | ४४ | ९ पै | ०.०१५० |
| १०२ | ४४ | १० | ०.०४०० |
| १०३ | ४५ | १०ब | ०.०५०० |
| १०२ | ४५ | १२ ड पै | ०.१००० |
| १०५ | ४५ | १९ फ पै | ०.०२४० |
| १०६ | ४५ | १९ ह | ०.०४०९ |
| १०७ | ४५ | २४ अ पै | ०.०३५० |
| १०८ | ४६ | ५ पै | ०.११०० |
| १०९ | ४६ | १४ इ पै | ०.०१९० |
| ११० | ४६ | २१ पै | ०.०५०० |
| १११ | ४९ | १०अ | ०.०५०० |
| ११२ | ४९ | १० क | ०.०९०० |
| ११३ | ४९ | १० इ | ०.१५०० |
| ११४ | ४९ | १३ ब | ०.०३०० |
| ११५ | ५० | ८ | ०.०१०० |
| ११६ | ५० | ९ | ०.०२०० |
| ११७ | ५१ | १२ब | ०.०१०० |
| ११८ | ५२ | ११ क | ०.०५०० |
| ११९ | ५२ | ११ इ | ०.०२०० |
| १२० | ५२ | ११ज पै | ०.०७०० |
| १२१ | ५२ | ११ म पै | ०.०४५० |
| १२२ | ५२ | १२ पै | ०.१७३० |
| १२३ | ५३ | ३ पै | ०.००४७ |
| १२४ | ५८ | २ अ | ०.०२५० |
| १२५ | ५८ | २ क | ०.०२८० |
| १२६ | ६२ | १ब पै | ०.००६० |
| १२७ | ६२ | ३ | ०.०५०० |
| १२८ | ६४ | १अ पै | ०.००१० |
| १२९ | ६९ | २ पै | ०.००१३ |
| १३० | ७० | १ पै | ०.०००६ |
| १३१ | ७३ | पै | ०.०६८० |
| १३२ | ७९ | पै | ०.०६३० |
| | | | ९.०१५० |

सही/-
(डॉ. संदीपान सानप)
उपविभागीय अधिकारी,
माणगांव उपविभाग, माणगांव

दिनांक :- १० /०७/२०२५

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/९९/९५९/२०२५

# महावितरणच्या मेन लाईनमध्ये छेडछाड

**नवी मुंबई : बातमीदार**

सध्या महावितरणमध्ये वीजबिल वासुलीसोबत वीज जोडणी तपासणीची जोरदार मोहीम सुरू आहे. अशाच एका कारवाई दरम्यान महावितरणच्या नेरूळ विभागातील पाम बीच शाखेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ५६ हजार ९०० रुपयांची वीजचोरी उघडकीस आणली आहे. तपासणी केली असता, सदर ग्राहक मेन लाईन मध्ये छेडछाड करून वीजचोरी करत असल्याचे निदर्शनास आले. याबाबत, भारतीय विद्युत अधिनियम २००३, कलम १३५ नुसार वाशी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भांडूप परिमंडलातील विविध मंडळात वीज जोडणी तपासणी मोहीम सुरू आहे. अधीक्षक अभियंता श्री. दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व नेरूळ विभागाचे कार्यकरी अभियंता सुहास बेडगकर यांच्या सूचनेनुसार सहाय्यक अभियंता हेमंत चोरे व त्यांचे सहकारी संतोष कोलेकर व



राहुल झेंडे कुकशेतगावातील सेक्टर १४, नेरुळ येथे दैनंदिन वीज तपासणी साठी गेले होते. तेथील प्लॉट क्र. १४, घर क्र. ३०२ च्या मीटर मध्ये काही अनियमितता आढळून आली. तपासणी केली असता, मेन लाईन कट आऊट मधून २.५ चौरस मीटरची वायर जोडून थेट एमसीबी मधून अनधिकृतपणे विद्युत पुरवठा होत असलेला आढळून आला. मीटर केबीन मधून बाहेर काढून निरीक्षण केल्यास त्या वायर घर क्र. ३०२, कांचन कंभा ठाकूर

**नेरूळमध्ये ५६ हजार ९०० रुपयांच्या वीज चोरीप्रकरणी गुन्हा**

यांच्या घरी जोडलेल्या असून त्यावर एक किलो वॅट भार चालू असल्याचे माहित पडले. ही बाब कांचन कंभा ठाकूर याला प्रत्यक्ष दाखविण्यात आले. सविस्तर माहिती केल्यावर सदर मीटरचा विद्युत पुरवठा ६ ऑक्टोबर २०२३ रोजी खंडित करणायत आला होता असे माहीत पडले. म्हणून गेल्या १४ महिन्यांपासून अनधिकृतपणे वीज वापर करत असल्यामुळे व २,५९८ युनिट ची ५६,९०० रुपयांची वीजचोरी व पी डी थकबाकी २५,९५० रुपये असे एकूण ८२,८५० रुपये रकमेचे महावितरणचे आर्थिक नुकसान केल्यामुळे कांचन कंभा ठाकूर यांच्यावर २७ जून २०२५ रोजी विद्युत कायदा २००३, कलम १३५ नुसार वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

वीजचोरी एक कीड असून महावितरण सोबतच ग्राहकांचा ही नुकसान होत आहे. ग्राहकांनी अधिकृतपणे वीज वापर करावे व वापरलेल्या विजेचे बिल नियमितपणे भरावे अशी नम्र विनंती भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. संजय पाटील यांनी केली. तसेच याप्रकारे कोणी जर मीटरमध्ये छेडछाड करून वीजचोरी करीत असल्याचे आढळल्यास यापुढे आणखी कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा त्यांनी या वेळी दिला.

# प्रज्ञाशोध परीक्षेत 'सीकेटी'चे विद्यार्थी चमकले

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा या राज्यस्तरीय परीक्षेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिची चमक दाखविली आहे. या परिक्षेस एकूण ६९ विद्यार्थी बसले होते. त्यातील ४ विद्यार्थी तालुकास्तरीय गुणवत्ता प्राप्त, १ विद्यार्थ्याला विशेष गुणवत्ता तर ३ विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षिस प्राप्त झाले आहेत. तर ३८ विद्यार्थ्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व शाळांमधून ही परीक्षा घेतली जाऊन त्यातून निवडक विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात येते. या परीक्षेत सोहम इंदुलकर, सोहम ठाकूर, ऋत्विक पाटील, आदित्य पवळे, आदित्य कोळी, ईश्वरी उमेशखाडे, आर्या सुर्वे, तन्मय महाजन अशा एकूण ३६ विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. या वेळी भाजप कामगार मोर्च्याचे प्रदेश सचिव संजय भगत, मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष सानपाडा विभागाच्या माध्यमातून १०वी, १२वी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा वनमंत्री नामदार गणेश नाईक यांच्या हस्ते रविवारी (दि.१३) करण्यात आला.

यावेळी बोलताना वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, विध्यार्थ्यांमध्ये स्पर्धा नसेल तर गुणांची वाढ होणार नाही. आपल्या केंद्र आणि राज्य सरकारचं धोरण तरुणाभिमुख आहे. शिक्षणच नाही तर क्रीडा, उद्योग, व्यापार क्षेत्रामध्ये तरुणांनी झेप घ्यावी, आज ज्या विद्यार्थ्यांचा सन्मान झाला आहे, त्यांना भविष्यात कोणतीही अडचण आली तर गणेश नाईक तुमच्यासाठीच आहे, हा विश्वास बाळगावा आणि आकाशाला गवसणी घालावी अशा शुभेच्छा नाईक यांनी दिल्या.

या वेळी भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ.राजेश पाटील, उत्तर भारतीय मोर्चाचे माजी नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष राजेश राय, कार्यक्रमाचे आयोजक भाजपा सानपाडा जुईनगर मंडळ अध्यक्ष सुनील कुरकुटे, भाऊ भापकर, शिल्पा ठाकूर, शैला पाटील, राजेश ठाकूर आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दत्ता पाटील, भालचंद्र पाटील, ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी विठ्ठलराव गव्हाणे, रामचंद्र काजोळकर, गणेश कमळे, राजू सैद, नितीन भोर, भाऊसाहेब आहेर सर,राजश्री कमळे, वृषाली चव्हाण,स्नेहा पवार, संमित जाधव सर, जयंत नाईक, सुनील चव्हाण, सुनील नाईक, श्रीराम मढवी, भाऊसाहेब पानमंद सर आदींचे सहकार्य लाभले. या वेळी विद्यार्थी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुईनगर, नेरूळ येथील उद्यान सुशोभिकरणाचे भूमिपूजन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील जुईनगर आणि नेरूळ येथील प्रभाग क्रमांक ८२ आणि ८४ मधील छत्रपती संभाजी महाराज उद्यान, सेक्टर २, नेरूळ येथे नागरिकांसाठी ओपन जिम, मुलांसाठी खेळणी आणि बसण्यासाठी बेंचेस यांच्या निर्मितीचे भूमिपूजन ठाणे लोकसभा खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते झाले. निधीतून निधीतून सदर काम पूर्ण होत आहे. स्थानिक माजी नगरसेवक रंगनाथ औटी यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.

रंगनाथ औटी यांच्यासारखे कार्यकर्ते शिवसेनेची जनसेवेची परंपरा पुढे नेत असून औटी यांचे सामाजिक आणि राजकीय योगदान स्थानिक नागरिकांच्या मनात कायमस्वरूपी स्थान निर्माण करेल असा आशावाद



खासदार नरेश म्हस्के यांनी बोलताना व्यक्त केला तर नागरिकांच्या सुख-समृद्धीसाठी आणि प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध आहे. हा प्रकल्प आपल्या सर्वांच्या सहकार्याने यशस्वी होईल असे माजी नगरसेवक रंगनाथ औटी यांनी बोलताना सांगितले.

नेरूळ आणि जुईनगर येथील स्थानिक रहिवाशांनी इथं व्यायामासाठी आधुनिक सुविधा आणि मुलांना खेळण्यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध व्हावी, यासाठी माजी नगरसेवक रंगनाथ औटी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. औटी यांनी खासदार नरेश म्हस्के यांच्याशी समन्वय साधून निधी मंजूर करून घेतला. या प्रकल्पामुळे प्रभागातील नागरिकांना, तरुणांना आणि मुलांना निरोगी आणि सकारात्मक वातावरण मिळणार आहे.

या भूमिपूजन सोहळ्याला शिवसेना नवी मुंबई जिल्हा प्रमुख द्वारकानाथभोईर, उपजिल्हा प्रमुख दिलीप घोडेकर, शहर प्रमुख विजय माने तसेच शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकसंख्यावाढीबाबत जनजागृती कार्यक्रम



**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब पनवेल, लिओ क्लब पनवेल आणि लिओ क्लब पनवेल ल्यूमिना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनाचे अनोख्या पद्धतीने आयोजन करण्यात आले.

समाजहिताच्या कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या लायन्स क्लब पनवेलने या वेळी धरती माँ वर्सेस मानव या जनजागृती पथनाट्याच्या माध्यमातून पनवेल शहरातील पाच प्रमुख ठिकाणी जनतेमध्ये लोकसंख्या वाढीबाबत जागरूकता निर्माण केली. भारतातील वाढती लोकसंख्या आणि तिचा विकासावर होणारा परिणाम या विषयावर प्रभावी संदेश देणारे हे पथनाट्य जनमानसाच्या मनाला भिडले.

या उपक्रमाचे रेल्वे स्टेशन अधिकारी सत्येंद्र सिंह व सहाय्यक पोलीस आयुक्त विकास पवार यांनी विशेष कौतुक केले व आयोजकांचे अभिनंदन केले. या उपक्रमाचे आयोजन लायन्स क्लब पनवेलच्या अध्यक्ष सुरभी पेंडसे, लिओ क्लब पनवेलच्या अध्यक्ष आरुषी गोडबोले, लिओ क्लब पनवेल ल्यूमिनाच्या अध्यक्ष अनिका पोतदार कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक गिल्डा, ज्योती देशमाने, नागेश देशमाने, मंगला ठाकूर, प्रतिमा चौहान, मोतीलाल जैन, गौतम म्हात्रे, के. एस. पाटील, सुयोग पेंडसे तसेच सर्व लिओ सदस्य त्यामध्ये आरुशी गोडबोले, अदिश्री पाटील, कशिश गनजावे, श्रेया तावरे, एलएन आदित्य पुंडे, अनिका पोतदार, क्रिष्णा कडिअन, रिषा फर्नांडीस, स्वरा पेंडसे या सर्वांच्या संयुक्त प्रयत्नातून जनजागृती उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि तो यशस्वीरीत्या झाला.

# लोकशाही दिनी तीन अर्ज प्राप्त

**नवी मुंबई :** कोकण विभागीय लोकशाही दिन कोकण भवनमध्ये अप्पर आयुक्त (सामान्य प्रशासन) राजलक्ष्मी शाह यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या वेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात आली. या वेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या चार असून आलेल्या अर्जांची संख्या तीन आहे, असे एकूण प्राप्त अर्ज सात होते. त्यापैकी तीन अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. आता कोकण विभागीय स्तरावर चार अर्ज प्रलंबित आहेत.



**तळोजा : एमआयडीसी येथे तृप्थी फॅमिली रेस्टॉरंट सुरू झाले आहे. यानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी सदिच्छा भेट दिली. या वेळी राम पाटील, हरिष पाटील आणि रोशन पाटील यांनी स्वागत केले.**

# नवीन पनवेल ते सिद्धिविनायक मंदिर पदयात्रा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संकष्ट चतुर्थीनिमित्त नवीन पनवेल येथील अष्टविनायक मित्र मंडळाच्यावतीने मंडळाचे अध्यक्ष अमित दिलीप जाधव यांच्या नेतृत्वाखाली नवीन पनवेल ते दादर मुंबई सिद्धिविनायक मंदिर अशी पदयात्रा काढण्यात आली.

या पदयात्रेत प्रेम लाटकर, ओमकार गिड्डे, मीत राठोड, सुमित राठोड, निखिल शिवतरकर, जैनम जैन, अथर्वा कांबळे, सोहम जितेकर, शुभम नांदे,पारस कांबळे, दक्ष मुकादम, सोहम जाधव, लक्ष गायकवाड, अमित घोरपडे, सागर लोखंडे, अमित टेलकर, प्रितम जाधव आदींचा सहभाग होता.

# वेश्वी येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी शिबिर



**उरण : बातमीदार**

पी. पी. मुंबईकर विद्यालय, वेश्वी येथे दिनांक ११ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता शालेय विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, फुंडे यांच्या आरोग्य केंद्र समिती व जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

या शिबिरात इनव्हीजन आय हॉस्पिटल अँड लेसर सेंटरच्या नेत्र तज्ज्ञांनी सहभाग घेतला. प्रमुख नेत्रतज्ज्ञ डॉ. अमिषा ठाकूर, सहाय्यक जानवी पोपेटा आणि रिहॅब सय्यद यांनी विद्यार्थ्यांची तपासणी करून आवश्यक सल्ला दिला. काही विद्यार्थ्यांना चष्म्यांची गरज असल्याचे निदान झाले.

या शिबिरातून एकूण ११० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. कार्यक्रमाच्या आयोजनात मुख्याध्यापक माध्यमिक विभाग प्रितम टकले आणि मुख्याध्यापक प्राथमिक विभाग तृप्ती म्हात्रे यांनी मोलाचे सहकार्य केले. उपक्रमाचे यशस्वी आयोजन पी. टी. भोये (अध्यक्ष, आरोग्य केंद्र समिती) यांच्या पुढाकाराने तसेच प्राचार्य डॉ. अमोद ठक्कर (वीर वाजेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, फुंडे) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

शाळेचे शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालक वर्गाने या उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे आभार मानले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहते आणि नेत्र आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होते. भविष्यातही असे उपक्रम राबवावेत अशी अपेक्षा सर्व स्तरांतून व्यक्त करण्यात आली.

# 'प्रजापती'तर्फे महाराज दक्ष प्रजापती जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळ (रजि.) या राष्ट्रीय सामाजिक संस्थेच्या पनवेल नवी मुंबई विभागाच्या वतीने सृष्टीचे रचयिता, पृथ्वीचे पहिले महाराज, ब्रह्मदेवांचे मानसपुत्र व प्रजापती समाजाचे आराध्यदेव महाराज दक्ष प्रजापती यांच्या जयंतीनिमित्त त्यांचा फोटो पुष्पहार अर्पण करून, भक्तिभावाने आणि आनंदात कार्यक्रम साजरा करण्यात आला.

भारतीय वैदिक परंपरेमध्ये 'दक्ष प्रजापती' हे नाव सृष्टीच्या आरंभापासून महत्त्वाचे मानले जाते. ब्रह्मदेवांचे मानसपुत्र आणि प्रजापतींमध्ये श्रेष्ठ, ज्यांचे नावच 'दक्ष' म्हणजे कुशलतेचे प्रतीक. केवळ ऋषी नव्हे, तर वेद, यज्ञ, अनुशासन, मर्यादा आणि पारिवारिक मूल्य प्रणालीचे प्रचारक म्हणूनही त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. वेद, पुराण आणि उपनिषदांमध्ये त्यांचा उल्लेख एखाद्या देवतेसारखा नव्हे, तर एक महान विचारवंत व अनुकरणीय व्यक्तिमत्त्व म्हणून केला जातो.

कार्यक्रमात मोठ्या संख्येने समाजबांधवांनी उपस्थित राहून महाराज दक्ष प्रजापती यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण



करून दर्शन घेतले. कार्यक्रमाच्या वेळी वातावरण श्रद्धेने भारलेले होते.

या वेळी उपस्थित मान्यवरांनी समाजाच्या एकात्मतेवर आणि विकासावर भर दिला. शिक्षण हे समाज प्रगतीचे प्रमुख साधन असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्र प्रताप प्रजापती यांनी सांगितले की, संस्थेच्या माध्यमातून समाजोपयोगी अनेक उपक्रम राबवले जातात, जसे की - शैक्षणिक किटचे वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, वृक्षारोपण, वैद्यकीय शिबिर, स्वच्छता मोहिमा इत्यादी.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सी. पी. प्रजापती, गजेन्द्र प्रजापती, इंदर प्रजापती, विशाल जोगिंदर प्रजापती, संजय कुंभार, रोहित राजेंद्र प्रजापती, लव कुमार प्रजापती, गोवर्धन प्रजापती, कुलदीप प्रजापती, आदर्श प्रजापती, राकेश कुमार प्रजापती, विशाल प्रजापती, सागर प्रजापती, संजय पन्नालाल प्रजापती, रोहित रामू प्रजापती, संजय प्रजापती, सियाराम प्रजापती, अनिरुद्ध प्रजापती यांच्यासह अनेक सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# पुई भिक्षेकरीगृह रस्त्याची दुर्दशा

## नागरिकांच्या जीवाला धोका

**कोलाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील कुंडलिका नदीच्या बाजूंनी जाणाऱ्या महिला व बाळ विकास अधीक्षक शासकीय भिक्षेकरीगृहाकडे जाणाऱ्या रस्त्याची अतिशय दैनिय अवस्था झाली असुन या मार्गांवरून जाणाऱ्या नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला असुन या मार्गांनी प्रवास करतांना जाणारी वाहने ही मुंबई गोवा हायवेवर पार्किंग करून नागरिकांना पायी चालत जावे लागत आहे.



मुंबई-गोवा महामार्गावरून महिला व बाळ विकास अधीक्षक शासकीय पुरुष भिक्षेकारीगृहकडे जाणारा रस्ता एक ते दिड किलोमीटर अंतरावर असुन या मार्गांकडे जाणारा सुरुवातीचा रस्ता वरून खाली गेला असुन या रस्त्याला प्रचंड चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या रस्त्याची अतिशय भयानक अवस्था झाली आहे की या मार्गांवरून कोणतेही वाहन जाऊ शकत नाही.सर्व प्रकारची वाहने हायवेवर पार्किंग करून येथील नागरिकांना पायी चालत जावे लागत आहे.

याशिवाय याच मार्गांवर दोन ते तीन किलोमीटर अंतरावर तालुका फळरोपवाटिका कोलाड नर्सरी असुन येथील आंबा, काजु, चिकु व इतर फळ झाडे शेतकरी वर्गाला सरकारी अनुदानातून लागवड करण्यासाठी दिली जात आहे. सद्या फळरोप लागवड करण्याचा हंगाम सुरू असुन या नर्सरी मधून फळ रोपे वाटप करण्यात येत आहे. परंतु या रस्त्याची दैनिय अवस्था पाहता ही फळ रोपे डोक्यावर किंवा बैलगाडीने रस्त्यावर आणावी लागत आहेत. यामुळे फलरोपवाटिकेचे अधिकारी, कामगार तसेच शेतकरी वर्गाला ही याचा त्रास सहन करावा लागत आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरी करणाचे काम गेली आठरा वर्षांपासून सुरू असुन ते अद्याप ही अर्धवट स्थितीत आहे, परंतु मुंबई-गोवा हायवे वरून असंख्य गावाकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अतिशय बिकट करून ठेवली असुन असंख्य गावातील लोकांना मुंबई-गोवा हायवेकडे येजा करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. यामुळे दररोज अपघात होऊन असंख्य प्रवाशी जखमी होत आहेत तर या महामार्गलगत पनवेलपर्यंत जाईपर्यंत कोणताही मोठा दवाखाना नसल्यामुळे गंभीर दुखापतग्रस्तांना आपला जीव गमवाया लागत आहे. याला जबाबदार कोण? अशी प्रतिक्रिया प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.

# ई-रिक्षावर झाड कोसळले

## माथेरानमध्ये चालक, प्रवासी जखमी

**माथेरान : प्रतिनिधी**

दस्तुरी ते माथेरान असा प्रवास करीत असलेल्या ई-रिक्षा क्रमांक १० वर एक महाकाय झाड कोसळले. यामध्ये चालक व प्रवासी यांना मोठी दुखापत झाली असून त्यांना तत्काळ येथील बी.जे.रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

पर्जन्यवृष्टी सुरू असल्याने विविध भागात झाडे उन्मळून पडण्याचा घटना घडत असताना दस्तुरीकडून माथेरानकडे जात असलेल्या ई-रिक्षावर काळोखी भागातील चढावर एक महाकाय झाड पडले.

सुदैवाने जीवितहानी झाली नसून ई-रिक्षाचालक प्रशांत गायकवाड आणि ई-रिक्षा मधील एक महिला आणि एक पुरुष प्रवासी यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांना तत्काळ येथील बी.जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर येथील वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्ल्यानुसार पुढील उपचारासाठी त्यांना उल्हासनगर येथील रुग्णालयात घेऊन गेल्याचे समजते तसेच झाड कोसळलेल्या ई-रिक्षाचेसुद्धा मोठे नुकसान झाले असून ई-रिक्षावर झाड कोसळण्याची ही दुसरी घटना माथेरान शहरात घडली आहे.

# कोस्ते बुद्रुक गावाजवळ एसटी बसला अपघात

## वाहनचालकासह सहा प्रवासी किरकोळ जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावहून जामखेडकडे निघालेल्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसला कोस्ते बुद्रुक गावाजवळ अपघात झाला. हा अपघात सोमवारी (दि.१४) सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास माणगाव-पुणे मार्गावरील एका तीव्र वळणावर समोरून येणाऱ्या दुसऱ्या एसटी महामंडळाच्या बसला चुकवताना घडला. या बसमध्ये एकूण २९ प्रवासी होते. यामध्ये वाहनचालकासह सहा प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. अपघात होताच बसच्या काचा फुटल्या आणि प्रवाशांमध्ये कांही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असून जखमींना तातडीने माणगाव ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी हलवण्यात आले आहे.



माणगाव बस आगाराची, माणगाव जामखेड ही परिवहन महामंडळाची बस क्र. एम एच. १३ सीयु ६९३७ ही माणगाव बस स्थानकातून सकाळी साडेनऊ वाजता निजामपूर स्वारगेट मार्गे जामखेड येथे निघाली होती. ती बस कोस्ते बुद्रुक गावाजवळ एका छोट्याशा वळणा जवळ आले वेळी त्याचवेळी पुणे बाजू कडून माणगाव दिशेने येणारी दुसरी एसटी महामंडळाची बस समोरासमोर आल्याने हा अपघात चुकवण्यासाठी माणगाव - जामखेड या बसचे चालक बाळासाहेब सखाराम जोडगे यांनी आपल्या ताब्यातील बस रस्त्याकडेला घेत असताना साईड पट्टीवर गाडी स्लीप होऊन रस्त्याकडेला कलंडून हा अपघातात घडला. बसमधील चालक - वाहक व चार प्रवासी किरकोळ जखमी झालेची घटना घडली.

या बसमध्ये दत्तू सुतार, बाबू शिंदे, विकास जाधव, विठ्ठल ढोकळ तसेच या बसचे चालक बाळासाहेब सखाराम जोडगे, वाहक सुनील प्रकाश केवड असेच सहा प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. जखमींना माणगाव उपजिल्हा रुग्णालयात पुढील उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

# कशेडी घाटात धोकादायक डोंगराला जाळीचा आधार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटामध्ये उभ्या कापलेल्या डोंगरातून लाल मातीचे ढिगारे कोसळण्यास प्रतिबंध करण्यासाठी गल्वेनाईज्ड स्टील जाळ्या बसविण्यात आल्या आहेत. यामुळे घाटातील वाहतूक अचानक दरडी कोसळून ठप्प होणार नाही असा तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटातील चोळई व धामणदेवी भोगाव या दरडग्रस्त क्षेत्रावर महामार्ग बांधकाम विभागामार्फत उभ्या कापलेल्या डोंगरातून कोसळू पाहर्णाऱ्या धोकादायक दरडीवर सुरक्षिततेचा उपाय म्हणून गल्वेनाईज्ड स्टीलच्या ३०-३५ फुट उंच जाळ्या टाकण्यात येत आहेत. चोळई गावठाणापासून धामणदिवीपर्यंत उभ्या कापलेल्या डोंगरातून कोसळणाऱ्या दरडींना काही प्रमाणात प्रतिबंध करण्यात आला आहे.

दरडग्रस्त भागात धोकादायक दरडींवर गल्वेनाईज्ड स्टीलच्या जाळीचे सुरक्षा कवच टाकण्यात येत असल्याने वाहनचालक व प्रवासी जनतेला तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी डोंगरातून महाकाय दरडी अथवा लाल मातीचे ढिगारे मोठ्या प्रमाणात कोसळल्यास गल्वेनाईज्ड स्टीलच्या जाळ्या तकलादू उपाययोजना ठरणार आहे.



# चौक बाजारपेठेत रस्ते कामाला गती


## वाहनचालकांसह नागरिकांकडून समाधान व्यक्त

**चौक : प्रतिनिधी**

चौक बाजारपेठमधील रस्ता लवकरच मोकळा श्वास घेणार अशी आशा चौक ग्रामस्थ, व्यापारी, ग्राहकांना निर्माण झाली आहे. अशा प्रकारे कामाची गती राहिल्यास गणपती बाप्पा मोरया यांचे आगमन सुखकर होईल, अशीही अपेक्षा व्यक्त केली.

ग्रुप ग्रामपंचायत चौक हद्दीतील चौक बाजारपेठ मधील रस्ता आणि गटाराचे काम सुरू आहे. हे काम सुरू करताना अनधिकृत बांधकाम, फेरीवाले, गटारातून जाणाऱ्या पाण्याचा योग्य निचरा, पाण्याची पाईप लाईन, विद्युत खांब, पार्किंग, वाहनांना येण्या जाण्यासाठी प्रवेश, मार्ग आशा अनेक प्रकारच्या अडचणी समोर होत्या. त्यामुळे कामाची गती धीमी झाली होती. याची दखल स्थानिक स्थरावर घेण्यात आली. होणाऱ्या कामामुळे तात्पुता त्रास होणे क्रमप्राप्त आहे.

नागरी सुविधा निर्माण होताना आणि त्या पूर्ण होताना मधल्या काळात त्रास होतोच, अशी पक्की भावना निर्माण झाल्यावर स्थानिक स्वराज्य संस्था, स्थानिक नेते, पोलीस प्रशासन, व्यापारी, ग्राहक, ग्रामस्थ यांच्या सहकार्याने रस्त्याच्या कामाला गती आली असून ही कामाची गती अशीच राहिली तर होणाऱ्या रस्त्यावरून येणाऱ्या गणरायांचे आगमन सुखकर आणि खड्डा मुक्त होईल, अशी आशा व्यक्त केली जात असताना, येत्या स्वातंत्र्य दिनी याच रस्त्याने खड्डे मुक्त प्रभातफेरी काढण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे ठेकेदार यांनी सांगितले. या रस्त्याच्या कामाची पोलीस दूरक्षेत्र चौकचे पोलीस उपनिरीक्षक विशाल पवार यांनी पाहणी केली.





**महावितरण**

## जाहीर निवेदन

महापारेषण यांचे २२०/१००/२२ के.व्ही. कांदळगाव उप केंद्रातील २२ केव्ही बसचे देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यासाठी खालीलप्रमाणे माणगाव उप विभाग, रोहा विभाग, महावितरण यांचे २२ के.व्ही. वीजवाहिन्या बंद करण्यात येत आहे.

| अ. क्र. | २२ के.व्ही. वीजवाहिन्या बंद करण्यात येत आहे. | दिनांक | वेळ | प्रभावित होणारी गावे |
|---|---|---|---|---|
| १ | २२के.व्ही. माणगाव फीडर | १५.०७.२०२५ | ८:०० ते १७:०० | कसबेवाडी, घोटेवाडी, चनाट, हरवंडी, केळगणं, बोरवाडी, शिरसाड, चाच, माजुको, कुंभे , कामतवाडी, मळ्याची वाडी , धामणी , कातळाची वाडी , भारीदवाडी, हरवंडी कोंड , कोशिंबळे, निजामपूर, भाले, कुंभारते कोस्ते खु., कोस्ते बु, कोस्ते आदिवाडी, बागवाडी, फणसवाडी, माणगाव, उतेखोल, उतेखोलवाडी, खादाड , भादाव, नानोरे, मोरबा, साईव, मोजुरने, डोंगरोली, विहूले, विहूले आदिवासीवादी, उसर, उसर बु., विहूले कोंड, काकल, नाळेकोंडी, रानवडे, महादपोली, खारवली, साले, पळसगाव, पळसगाव खु., खरवली, रिले, सुरव, पाणेसे, बोरघर, आमडोशी, होडगाव, जोर घरोशी, जावळी, मुगवली, घरोशी आदिवासीवाडी, गांगवली, बांबवली, जांभूळवाडी , लोणशी, बोरघर, इंदापूर , दाखणे, कालवा , रुदोली, गंगेवाडी, पोटनेर, माकटी, उमरोली, दिवाळी, कोलाड, आंबेवाडी, पाले, संबे, वरसगाव, रानवाड, घोटवड, खांब, घाटाने, देवकाने, नडवली, अनव्हाळ, वैजनाथ,पुई, पुगाव, आदिवासीवाडी, चिंचवली, कोलाड आदिवासीवाडी, विंचवली, लोणशी मोहल्ला, वावे, गारळ, आडघर, उमरोली,चेरवली, लहाने सूरव, जाधव सूरव, राजीवली, बामणोली,मांगवली,कळमजे, साळवे, धालघर, करंबेली, खर्डी बु., खर्डी खु., चव्हाणवाडी, खरबाची वाडी, कात्याची वाडी, निलगुण, निवी, कालवण, कशेणे, पान्साई, वाढवण, कोल्हाण, नागरोली, वारक, विघवली, पाचोळे, मुठवली |
| २ | २२के.व्ही. धाटाव फीडर | | | |
| ३ | २२के.व्ही. कोलाड फीडर | | | |
| ४ | २२के.व्ही. कुडली फीडर | | | |
| ५ | २२के.व्ही. एमआयडीसी फीडर | | | |

अधिकमाहितीसाठी :- eeroha@mahadiscom.in, eeroha@rediffmail.com

सही/-

PRO No. 211 — कार्यकारी अभियंता, सं व सु. म.रा.वि.वि.कं.मर्या., विभाग रोहा



**माणगांव नगरपंचायत, माणगांव**

ता. माणगांव, जि. रायगड, पिनकोड ४०२१०४

Email- nagarapanchayatmangaon@gmail.com दु.क्र. ०२१४०२६३०५६

जा.क्र./मानपं/जा.नि./६३५/२०२५-२०२६ दिनांक १४/०७/२०२५

## जाहीर फेरनिविदा/निविदा सूचना

निम्ननिर्देशित कामाकरीता इच्छुक ठेकेदारांकडून दोन लखोटा पद्धीतीने सिलबंद निविदा खाली नमुद कालावधी पर्यंत मागविण्यात आले आहेत. कोरी निविदा मागणी अर्ज खाली नमुद कालावधीपर्यंत लेखी स्वरूपात माणगांव नगरपंचायत कार्यालयात कोरी निविदा पत्राची फी (ना परतावा) भरून मिळू शकतील.

| अ.क्र. | कामाचे नांव | कालावधी रक्कम | इसारा फॉर्म फी | निविदा |
|---|---|---|---|---|
| १ | माझी वसुंधरा अभियान अंतर्गत माणगांव नगरपंचायत करिता कापडी पिशवी छपाई करणे. (फेर निविदा क्र. १) | दि.१५/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ | ५,०००/- | ५००/- |
| २ | नगर पंचायतीस विविध कार्यक्रमा करिता मंडप, स्पीकर, स्टेज इत्यादी पुरवठा करणे (फेर निविदा क्र. १) | दि.१५/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ | २,०००/- | ५००/- |
| ३ | नगर पंचायतीस विविध कार्यक्रमा करिता बुके, हार व इत्यादी पुरवठा करणे. (फेर निविदा क्र. १) | दि.१५/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ | २,०००/- | ५००/- |
| ४ | नगर पंचायतीस विविध उत्सव/समारंभाकरीता व सभेकरीता चहा व नाष्टा पुरवठा करणे. (फेर निविदा क्र. १) | दि.१५/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ | २,०००/- | ५००/- |
| ५ | माणगांव नगरपंचायत कार्यालयाकरीता वाहन पुरवठा करणे. (फेर निविदा क्र. १) | दि.१५/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ | ५,०००/- | ५००/- |
| ६ | नगर पंचायतीच्या कर्मचाऱ्यांना रेनकोट व छत्री पुरवठा करणे (फेर निविदा क्र.१) | दि.१५/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ | २,०००/- | ५००/- |
| ७ | माणगांव नगर पंचायतीला विविध कामासाठी जेसीबी, क्रेन, पोकलेन, ट्रक, डंपर, ट्रॅक्टर इत्यादी वाहन व यंत्रसामुग्री पुरवठा करणे. (फेर निविदा क्र. १) | दि.१५/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ | १०,०००/- | १०००/- |
| ८ | माणगांव नगरपंचायत हद्दीमध्ये ग्रीट पुरवठा करणे व पसरवून देणे. (फेर निविदा क्र. १) | दि.१५/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ | १०,०००/- | १०००/- |
| ९ | माणगांव नगर पंचायतीच्या पाणीपुरवठा विभागाकरीता आवश्यक साहित्य पुरवठा करणे. (फेर निविदा क्र. १) | दि.१५/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ | १०,०००/- | १०००/- |
| १० | माणगांव नगरपंचायतीचे जलशुध्दीकरण केंद्र व पंप हाऊस येथील पंपाची देखभाल व दुरूस्ती करणे. (फेर निविदा क्र. १) | दि.१५/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ | १०,०००/- | १०००/- |
| ११ | माणगांव नगर पंचायतीच्या पाणीपुरवठा विभागातील पाणीपुरवठा करणाऱ्या वाहिन्या वरिल स्लुस वॉल मधील चेक नट व स्पिंडल दुरूस्ती करणे/नविन तयार करणे (फेर निविदा क्र. १) | दि.१५/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ | २,०००/- | ५००/- |
| १२ | माणगांव नगरपंचायत हददीतील जलशुद्धीकरण केंद्र परिसर व माणगांव नगरपंचायत कार्यालयामध्ये CCTV यंत्रणा बसविणे (फेर निविदा क्र. १) | दि.१५/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ | २,०००/- | ५००/- |
| १३ | माणगांव नगरपंचायत हद्दीमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत बॅनर छपाई करणे. | दि.१५/०७/२०२५ ते २९/०७/२०२५ | ५,०००/- | ५००/- |
| १४ | माणगांव नगरपंचायत हद्दीमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत सार्वजनिक शौचालयाकरिता पी.पी.ई किट व आवश्यक साहित्य पुरवठा करणे | दि.१५/०७/२०२५ ते २९/०७/२०२५ | ५,०००/- | ५००/- |
| १५ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत माणगांव नगरपंचायत हद्दीमध्ये सार्वजनिक शौचालयांची टाकी सक्शन मशीनव्दारे उपसा करणे. | दि.१५/०७/२०२५ ते २९/०७/२०२५ | २,०००/- | ५००/- |

**कामाच्या अटी व शर्ती**
वरील कामांच्या निविदा बाबतची अटी, शर्ती व निविदा फॉर्म माणगांव नगरपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.

सही/-
**मुख्याधिकारी**
माणगांव नगरपंचायत



## सार्वजनिक सूचना

लक्ष्मी ऑप्थॅल्मिक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या सूचनेद्वारे सर्व जनतेला कळवत आहे की ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२० पर्यंतच्या ओपीडी आणि ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ पर्यंतच्या आयपीडीच्या जुन्या वैद्यकीय नोंदी (एमएलसी, न्यायालयीन प्रकरणे आणि बालरोग प्रकरणे वगळता) खालील ठिकाणी टाकून द्याव्यात. लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट, उरण रोड, जुने पनवेल ४१०२०६. ज्या रुग्णांना त्यांचे वैद्यकीय कागदपत्रे घ्यायची आहेत त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर एक महिन्यानंतर लक्ष्मी ऑप्थॅल्मिक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, जुने पनवेल येथील एमआरडी विभागाशी संपर्क साधावा. आम्ही ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२० ओपीडी आणि ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ आयपीडी (एमएलसी, कोर्ट केसेस आणि पेडियाट्रिक्स केसेस वगळता) सर्व वैद्यकीय नोंदी नष्ट करू आणि त्यासाठी जबाबदार राहणार नाही.



## PUBLIC NOTICE

Laxmi Ophthalmic Services Pvt Ltd through this notice inform all public that the old medical records of OPD from 01/04/2018 to 31/03/2020 and IPD from 01/04/2018 to 31/03/2019 (except MLC, court cases & Pediatrics cases) are to be discarded at the following locations. Laxmi Charitable Trust, Uran Road, Old Panvel 410206. Any patient who wants to collect their medical documents may contact the MRD Department at Laxmi Ophthalmic Services Pvt Ltd,Old Panvel After one month of publication of this notice.we will destroy all medical records from from 01/04/2018 to 31/03/2020 OPD and from 01/04/2018 to 31/03/2019 IPD (except MLC, court cases & Pediatrics cases) and will not be responsible for same.



## पाहिजेत

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल-४१०२०६ येथे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात बी.एड. व एम. एड. या अभ्यासक्रमाकरिता घड्याळी तासिका तत्वावर खालील विषयाकरिता (Pedagogy) अध्यापक नेमण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पद | अभ्यासक्रम | विषय | पदसंख्या | नियुक्तीचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| सहाय्यक प्राध्यापक | बी.एड. | इतिहास, इंग्रजी,मराठी, ICT, अर्थशास्त्र, कॉमर्स | ६ | घड्याळी तासिका तत्वावर |
| सहाय्यक प्राध्यापक | एम.एड. | SEM II To IV सर्व विषय | ४ | घड्याळी तासिका तत्वावर |

युजीसी/एनसीटीई व शासन निर्णयानुसार अर्हताप्राप्त इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज, मूळ गुण-पत्रक व प्रमाणपत्रासह स्वखर्चाने प्रत्यक्ष मुलाखतीस रविवार १७/०८/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता, स्थळ. प्राचार्य कक्ष, शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल, जुना मुंबई पुणे हायवे, एस. टी. स्टँडजवळ, पनवेल - ४१०२०६ येथे उपस्थित राहावे.

दि. १४/०७/२०२५

सही/-
**प्राचार्य,**
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
पनवेल



## जाहीर हरकत नोटीस

तमाम जनतेस प्रस्तुत नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णनांकित मिळकत आमचे आशिल बळिराम दुंद्या म्हात्रे, सुदाम दुंधा म्हात्रे, कुंदा आंबो म्हात्रे, कैलास आंबो म्हात्रे, मच्छींद्र आंबो म्हात्रे, सीमा आंबो म्हात्रे, सारिका आंबो म्हात्रे यांचे पुर्वगामी काळु म्हात्रे यांचे कडुन प्राप्त वडीलोपार्जित मिळकत असुन सदर मिळकत आज रोजी बेकायदेशीरपणे बुध्दीबाई शंकर म्हात्रे (मयत), गणेश शंकर म्हात्रे, चंद्रकांत शंकर म्हात्रे, सावळाराम शंकर म्हात्रे, पुंडलिक शंकर म्हात्रे, निरा शंकर म्हात्रे यांचे नावे ७/१२ सदरी असुन सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| गावाचे नाव | सर्वे नं./गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|
| मोहो, पनवेल | ११८/२/१ | ०-३०-५० | ४.५० |

वरील मिळकत ही काळु म्हात्रे यांचे मृत्यु पश्चात सदर मिळकत वारसाने शंकर काळु म्हात्रे व आमचे आशिलांचे वडील दुंद्या काळु म्हात्रे यांचे मालकी हक्कात वारसाने आला असुन सदर मिळकत ही शंकर काळु म्हात्रे यांचे वारस बुध्दीबाई शंकर म्हात्रे व इतर यांचे प्रमाणेच बळीराम दुंद्या म्हात्रे यांचे वारस बळीराम म्हात्रे व इतर यांचा प्रत्यक्ष मालकी हक्क व हितसंबंध होता व आहे. आमचे आशिलांच्या माहितीप्रमाणे सदर मिळकत ही बुध्दीबाई शंकर म्हात्रे (मयत), गणेश शंकर म्हात्रे, चंद्रकांत शंकर म्हात्रे, सावळाराम शंकर म्हात्रे, पुंडलिक शंकर म्हात्रे, निरा शंकर म्हात्रे रा.:- मोहो यांनी त्रयस्त व्यक्तीस बेकायदेशीरपणे हस्तातंरित करण्याचा प्रयत्न चालु केला आहे. सदर हस्तांतरणांस आमचे आशिल बळिराम दुंद्या म्हात्रे, सुदाम दुंद्या म्हात्रे, कुंदा आंबो म्हात्रे, कैलास आंबो म्हात्रे, मच्छींद्र आंबो म्हात्रे, सीमा आंबो म्हात्रे, सारिका आंबो म्हात्रे यांची सक्त हरकत असुन उपरोक्त मिळकतीबाबत कोणीही कोणताही करार, मदार, साठेकरार, गहाण, हक्क सोड, मृत्युलेख, खरेदीखत अथवा अशा प्रकारचा कोणताही व्यवहार केल्यास सदर व्यवहारास आमचे आशिलांचे सक्त हरकत राहणार आहे. याउपरही असा कोणताही व्यवहार केल्यास तो आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. उलट असा व्यवहार करणाऱ्या व्यक्ती विरुध्द आमचे आशिल योग्य ती दिवाणी व फौजदार कारवाही करतील याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दि. १४/०७/२०२५

सही/-
**ॲड. महेश एच. मोहिते**

अष्टगंध को.ऑप. होऊसिंग सो. रायवाडी कॉम्प्लेक्स, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड. मो. ९८२३४३६३२७
e-mail: adv.maheshmohite@gmail.com

# जॅनिक सिन्नर विम्बल्डनचा नवा 'किंग'

## अल्काराझला नमवत जिंकले पहिले विजेतेपद

**लंडन : वृत्तसंस्था**

जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या जॅनिक सिन्नरने विम्बल्डन पुरुष एकेरी स्पर्धा जिंकली आहे. सेंटर कोर्टवर झालेल्या अंतिम सामन्यात सिन्नरने गतविजेत्या कार्लोस अल्काराझचा ४-६, ६-४, ६-४, ६-४ असा पराभव करून टेनिसच्या मैदानावर आपले वर्चस्व सिद्ध केले.

सामन्याच्या सुरुवातीला अल्काराझने आपल्या लौकिकाला साजेसा खेळ करत आपल्या आक्रमक खेळाने पहिला सेट ६-४ असा जिंकून सिन्नरवर दबाव आणला. असे वाटत होते की अल्काराझ सलग दुसऱ्यांदा विम्बल्डन ट्रॉफी उंचावणार, पण सिन्नरचे इरादे काही वेगळेच होते.

पहिला सेट गमावल्यानंतर २४ वर्षीय सिन्नरने जबरदस्त पुनरागमन केले. त्याने आपल्या खेळात कमालीचा संयम आणि आक्रमकता यांचा सुंदर मिलाफ साधला. आपल्या अचूक सर्व्हिस आणि शक्तिशाली बेसलाइन फटक्यांच्या जोरावर त्याने अल्काराझला बॅकफूटवर ढकलले. दुसऱ्या आणि तिसऱ्या सेटमध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये प्रत्येक गुणासाठी चुरस पहायला मिळाली, पण महत्त्वाच्या क्षणी सिन्नरने खेळ उंचावत दोन्ही सेट ६-४, ६-४ असे जिंकून सामन्यात आघाडी घेतली.



चौथ्या सेटमध्ये सिन्नरचा आत्मविश्वास शिगेला पोहचला होता. त्याने अल्काराझला कोणतीही संधी न देता सुरुवातीपासूनच सामन्यावर पकड मिळवली. अखेर एक दमदार सर्व्हिस करत त्याने चॅम्पियनशिप पॉईंट जिंकला आणि टेनिसच्या या सर्वात प्रतिष्ठित स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. विजयानंतर सिन्नरने कोर्टवरच गुडघे टेकून आनंद साजरा केला.

सिन्नर आणि अल्काराझ यांच्यातील ही लढत टेनिसमधील नव्या पिढीच्या शानदार प्रतिस्पर्धेची ग्वाही देणारी ठरली. टेनिसच्या हिरवळीवरील या नव्या बादशाहच्या रूपाने सिन्नरने केवळ एक स्पर्धा जिंकली नाही, तर भविष्यातील अनेक रोमांचक सामन्यांची आणि एका शानदार कारकिर्दीची आशा निर्माण केली आहे.

# राज्य कबड्डी स्पर्धेचा उद्यापासून पुण्यात थरार

**पुणे : प्रतिनिधी**

तिसरी कबड्डीमहर्षी स्व. शंकरराव (बुवा) साळवी चषक निमंत्रित पुरुष-महिला राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा १६ ते २० जुलै या कालावधीत पुणे म्हाळुंगे येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉलमध्ये मॅटच्या क्रीडांगणावर रंगणार आहे. त्याचबरोबर बारावी पुरुष-महिला पुणे जिल्हा लीग कबड्डी स्पर्धादेखील होणार आहे.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सहकार्याने सतेज संघ बाणेरच्या विद्यमाने राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, तर बाबुराव चांदेरे फाउंडेशनच्या विद्यमाने पुणे लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यातील नामांकित अशा १२ पुरुष व १२ महिला संघांना निमंत्रित करण्यात आले आहे, तर पुणे जिल्हा कबड्डी लीग स्पर्धेकरिता पुण्यातील छावा पुरंदर, लय भारी पिंपरी चिंचवड, शिवनेरी जुन्नर, सिंहगड हवेली, वेगवान पुणे, बलाढ्य बारामती, झुंजार खेड, माय मुळशी असे पुरुष व महिला खेळाडूंचे आठ आठ संघ तयार करण्यात आले आहेत. स्पर्धा सकाळ व सायंकाळ अशा दोन्ही सत्रात खेळविण्यात येईल.

स्पर्धेतील अंतिम विजेत्या चारही संघांना प्रत्येकी चषक, पदक व दोन लाख ५० हजार रुपये प्रदान करण्यात येतील. उपविजेत्या चारही संघांना प्रत्येकी चषक, पदक व एक लाख ५० हजार रुपये बक्षीस दाखल देण्यात येतील. उपांत्य उपविजयी आठही संघांना प्रत्येकी चषक, पदक व एक लाख रुपये इनाम देण्यात येईल. स्पर्धेतील प्रत्येक गटातील सर्वोत्तम खेळाडू, उत्कृष्ट चढाई व पकड यांना प्रत्येकी २५ हजार रुपये देऊन गौरविण्यात येतील.

या स्पर्धेचे उद्घाटन केंद्रीय सहकार, नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहळ यांच्या हस्ते १६ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता होईल. समारंभास शिवाजीराव आढळराव पाटील (अध्यक्ष-पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ), अतुल बेनके (अध्यक्ष, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन), शीतल उगले (क्रीडा आयुक्त) आदी मान्यवर तसेच पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित राहणार आहेत, असे स्पर्धा आयोजन समिती प्रमुख व राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी कळविले.

# 'सेना' देशांमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या भारतीयांमध्ये बुमराह अव्वल

## अनिल कुंबळेला टाकले मागे



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जसप्रीत बुमराह याने इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यात पुन्हा एकदा आपली क्षमता सिद्ध केली. पहिल्या डावात पाच बळी घेतल्यानंतर दुसऱ्या डावातही त्याने दोन महत्त्वपूर्ण बळी मिळवले. त्याच्या अचूक माऱ्यामुळे इंग्लंडच्या फलंदाजांना दुसऱ्या डावात मोकळेपणाने फटकेबाजी करता आली नाही आणि त्यांच्यावर पूर्णपणे अंकुश राहिला. यामुळेच इंग्लंडचा संघ दुसऱ्या डावात १९२ धावांपर्यंतच मजल मारू शकला.

या सामन्यात एकूण सात बळी घेताच जसप्रीत बुमराह आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये 'सेना' (दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया) देशांमध्ये सर्वाधिक बळी घेणारा भारतीय गोलंदाज ठरला आहे. त्याने भारताचे महान फिरकीपटू अनिल कुंबळे यांचा विक्रम मोडला. बुमराहने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सेना देशांमध्ये आतापर्यंत एकूण २२३ बळी मिळवले आहेत, तर कुंबळे यांच्या नावावर २२२ बळींची नोंद आहे. अशा प्रकारे बुमराहने सर्व भारतीय गोलंदाजांना मागे टाकत या यादीत अव्वल स्थान पटकावले आहे.

इंग्लंडपूर्वी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरही बुमराहने छाप पाडली होती. त्याने आतापर्यंत ४७ कसोटी सामन्यांमध्ये एकूण २१७ बळी घेतले असून यात १५ वेळा एका डावात पाच बळी घेण्याचा पराक्रम त्याने केला आहे.

# नीरज चोप्रा, अरशद नदीम पुन्हा भिडणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पॅरिस ऑलिंपिक २०२४नंतर आता पुन्हा एकदा भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा आणि पाकिस्तानचा अर्शद नदीम आमनेसामने येणार आहेत. हे दोघे सिलेसिया डायमंड लीग २०२५मध्ये एकमेकांना भिडतील. ही स्पर्धा १६ ऑगस्ट रोजी पोलंडमध्ये होणार आहे.

गेल्या वेळी पॅरिस ऑलिंपिक २०२४मध्ये नदीमने ९२.९७ मीटर थ्रो करून सुवर्णपदक जिंकले होते, तर नीरज चोप्राला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते. आता चाहते पुन्हा एकदा या दोन्ही दिग्गजांमधील रोमांचक स्पर्धेची वाट पाहत आहेत. सिलेसिया डायमंड लीग २०२५ ची अधिकृत यादी अद्याप जाहीर झालेली नाही, परंतु आयोजकांनी पुष्टी केली आहे की, दोन्ही खेळाडू या स्पर्धेत सहभागी होतील.

# भारताचा हरिकृष्णन बनला ग्रँडमास्टर

**चेन्नई : वृत्तसंस्था**

स्वित्झर्लंड आणि स्पेनमध्ये दोन पात्रता निकष (नॉर्म) मिळविल्यानंतर चेन्नईच्या हरिकृष्णन ए.रा याने फ्रान्स येथील प्लाग्न आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महोत्सवात ग्रँडमास्टरचा तिसरा 'नॉर्म' मिळविला. आता हरिकृष्णन ८७वा भारतीय आणि तमिळनाडूचा ३२वा ग्रँडमास्टर बनला आहे.

वयाच्या पाचव्या वर्षापासून बुद्धिबळ खेळायला सुरुवात करणाऱ्या हरिकृष्णनने जुलै २०२३मध्ये स्वित्झर्लंड येथील स्पर्धेत पहिला 'नॉर्म' मिळविला. त्यानंतर दुसरा 'नॉर्म' त्याने स्पेनमधील स्पर्धेत मिळविला. समर्पित भावनेने खेळण्याच्या प्रवृत्तीने वयाच्या सातव्या वर्षीय त्याने 'फिडे' गुणांकन मिळविले. अशी कामगिरी करणारा तो पहिला भारतीय युवा खेळाडू ठरला होता. त्यानंतर २०१८मध्ये त्याने आंतरराष्ट्रीय मास्टर किताब मिळविला. अर्थात, ग्रँडमास्टर बनण्यासाठी त्याला आठ वर्षे वाट बघावी लागली.



***ग्रँडमास्टर बनल्याचा आनंद तर आहेच, पण मला इथेच थांबायचे नाही. युरोपमधील स्पर्धेतून मायदेशी परतताना ग्रँडमास्टर बनूनच परतायचे एक स्वप्न पूर्ण झाले आहे. आता मला मायदेशात पाऊल ठेवण्यापूर्वी माझे गुणांकन २५३० ते २५४०च्या आसपास आणायचे आहे.***

**-हरिकृष्णन म्हणाला.**

# आरजे महावश आणि युजवेंद्र चहल यांची लंडनमध्ये सफर




**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटपटू युजवेंद्र चहल धनश्री वर्माला घटस्फोट दिल्यापासून आरजे महावशला डेट करत असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. अनेक ठिकाणी त्यांना एकत्र स्पॉटही करण्यात आले. आता ते दोघे लंडनमध्ये एकत्र व्हॅकेशन एन्जॉय करत आहेत.

चहल आणि आरजे महावश या दोघांचे लंडनमधील काही फोटो समोर आले आहेत. या फोटोंमध्ये ते एकत्र दिसत नसले तरी एकाच स्पॉटवर उभे राहून चहल आणि महावशने हे फोटो काढल्याचे दिसत आहे. या दोघांनीही त्यांच्या सोशल मीडियावरून लंडन ट्रिपचे हे फोटो शेअर केले आहेत. त्यामुळे ते दोघेही एकत्र लंडन ट्रिपला गेल्याचे म्हटले जात आहे.

युजवेंद्र चहलने नुकतीच द ग्रेट इंडियन कपिल शर्मा शोमध्ये हजेरी लावली होती. यामध्ये त्याने महावशसोबतच्या रिलेशनशिपवर हिंट दिली होती. कोण आहे ती मुलगी? असे विचारताच आता सगळ्या भारताला माहितीये, असे चहल म्हणाला होता, पण अद्याप महावश किंवा चहलने त्यांच्यातील रिलेशनशिप ऑफिशियल केलेले नाही.




















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com